₹ १०/-

संत निरंकारी (मराठी)

वर्ष १८ वे अंक ७ वा जुलै २०१२

बागेश्वर (उत्तराखंड) येथे स्थानिय रितीरिवाजानुसार सद्‌गुरु बाबाजींचे स्वागत करीत असताना श्रध्दाळू

गजरौला (उ.प्र.) येथे श्रध्दाळूंना आशीर्वाद प्रदान करताना सद्‌गुरु बाबाजी

डेहरादून (उत्तराखंड) येथे आयोजित सत्संग समारोहात आशीर्वाद प्रदान करताना सद्‌गुरु बाबाजी

संत निरंकारी

(संत निरंकारी मंडळाचे ध्येय व कार्य आणि संत महापुरुषांची शिकवण देणारे भक्तिमार्गदर्शनपर मराठी नियतकालिक)

वर्ष १८वे | अंक ७ वा | जुलै २०१२ | पाने - ४०

❋ संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव ❋ सहसंपादक - श्री. जगन्नाथ चैतन्य मडकर

अनुक्रमणिका

संपादकीय	संपादक	२
श्रीगुरुवचनामृत	श्रीसद्गुरुदेव	१७
म्हणे अवतार	श्री. स. वि. लव्हटे	३
मिळून मिसळून कार्य करत असताना...	सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज	५
मातृवचनामृत	निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी	७
विवेक विचारधारेचा अनमोल खजिना	सौ. सरीता न. तळवडेकर	९
अनुभवाचे बोल... सद्गुरु आहे ना!	श्री. विकास अरोरा	११
आध्यात्मिकतेची वाट-भ्रष्टाचारापासून...	श्री. सुकदेव रु. पाटील	१३
वसुधैव कुटुंबकम्	श्री. रविंद्र दाभोळकर	१५
प्रेमाची भाषा सर्वोत्तम भाषा	श्री. शिवहरी म. वानरे	२५
माणुसकीनं वागूया!	श्री. नितीन ल. घुरुप	२७
कर्मकांड आचरुनी मानव ...	सौ. मयुरी म. गुंज	२९
खरंच आम्ही माणूस बनलो का?	श्री. सत्यनारायण बा. सौभागे	३१
देवाची ओळख-मनुष्याचे आद्यकर्तव्य	कु. अनिकेत सु. पांचाळ	३४
सत्संग एक कवडसा	सौ. मंगल मजगे	३६
ब्रह्मविद ब्रह्मैव भवति!	श्री. जगदीश म्हात्रे	३७

गीत/कविता

झोळी भरी	श्री. धर्मानंद आ. पटेकर	१६
जीवांचे कल्याण करा	सौ. वंदना लोखंडे	२८
तुझी भक्ती घडो देवराया	श्री. बंडू जोशी	३५

लेखकाच्या विचारांशी संपादक सहमत असणे अनिवार्य नाही.

वर्गणी	वार्षिक	आजीवन
भारत	₹ ८०/-	₹ ८००/-
इंग्लंड	£ 12	£ 150
युरोप	€ 15	€ 200
अमेरिका	$ 20	$ 250
कॅनडा	$ 25	$ 300

प्रति अंक रु. १०/-

कार्यालय/पत्रव्यवहार पत्ता
पत्रिका विभाग,
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, मुं - १४.
फोन : २४१० ५७ ४९
इंटरनेट: http://www.nirankari.org
ई-मेल: marathi@nirankari.org

मालक : संत निरंकारी मंडळ
संत निरंकारी सत्संग भवन,
माहूल रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७४.
दूरध्वनी : २५५३ १४ ६८

Member of All India Small and Medium Newspapers Association and Indian Languages Newspapers Association

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक आणि प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी हे मासिक प्रॉसेस्ड प्रिंटींग प्रेस, कुलकर्णी कॉटेज, गोखले क्रॉस रोड, दादर, मुंबई - ४०० ०२८, येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.

संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव

संपादकीय

सद्‌गुरु आणि भक्तीमार्ग

खरं पाहिलं तर भक्तीचं विश्वच निराळं आहे. भगवंत जितका विराट आहे; भक्ती तितकीच सूक्ष्म आहे. भगवंत जितका सूक्ष्म आहे; तितकीच भक्ती गहन आहे. प्रत्येकजण आपापल्या संकल्पनेप्रमाणे, रीतिरिवाजाप्रमाणे भक्तीची परंपरा केवळ पार पाडत आहेत. म्हणूनच शहनशाह बाबा अवतारसिंहजी म्हणतात,

मर्म न जाणे जग भक्तीचे ईश्वर प्राप्ती खरी भक्ती।

त्यागून भ्रम शंका सद्‌गुरुला प्रसन्न करणे खरी भक्ती।। (अ.वा. पद क्र.३०१)

भक्ती हे कर्मकांडाचं नाव नाही किंवा भक्ती ही विशिष्ट जात, धर्म, पंथ, वेशभूषा यांच्या संबंधित नाही. भक्ती हे अवस्थेचं नाव आहे. भक्त म्हणजे जोडलेला. जो भगवंताशी जोडलेला आहे तो भक्त! आणि अशा भक्ताची मनोवस्था किंवा सहज जीवन जगण्याची पध्दती म्हणजे भक्ती. ज्याच्या जीवनात परमात्मा येतो त्याची दशा बदलून जाते. जीवनाला योग्य दिशा प्राप्त होते.

भगवान श्रीकृष्णांनी अशा भक्ताला श्रेष्ठ भक्त म्हटलं आहे. भगवद्‌गीतेत वर्णन केल्याप्रमाणे चार प्रकारचे भक्त आहेत. आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू आणि ज्ञानी. आर्त भक्त हा संकटकाळी किंवा भीतीपोटी ईश्वराचा धावा करतो. संकट दूर झाल्यानंतर भगवंताचा त्याला विसर पडतो. अर्थार्थी भक्त हा कामनापूर्तीसाठी भक्ती करतो. कर्मकांड, नवस सायास करुन फळाच्या अपेक्षेने भक्ती करत असतो. तर जिज्ञासू भक्त केवळ जिज्ञासापूर्ती पर्यंतच मर्यादित असतो. हे तिन्ही खऱ्या भक्तांच्या श्रेणीत येत नाहीत. चौथा भक्त हा ज्ञानी भक्त आहे. सद्‌गुरुकृपेने ज्याला ब्रह्मानुभूती झालेली आहे असा पूर्णत्वाला पोचलेला हा भक्त भगवंताहून वेगळा नसतो. त्यामुळे अशा भक्ताचं प्रत्येक कर्म हे नुसतं कर्म नसून ते पूजा बनतं. त्याची प्रत्येक कृती ही अनुसरणीय बनते. मन-वचन-कर्माने तो पवित्र आणि निर्मळ असतो. ज्ञानी भक्त हा जन्म-मृत्यूच्या पलीकडे गेलेला असल्याने त्याची चित्तवृत्ती शांत असून त्यालाच 'स्थितप्रज्ञ' असंही म्हटलं आहे. अशी उच्च कोटीची भक्तीची अवस्था ही केवळ ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीशिवाय अशक्य आहे. ज्याच्या जीवनात सद्‌गुरु येतो त्याला ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होते. म्हणूनच संतांनी म्हटलंय,

सद्‌गुरु शरण जाय। तयास ब्रह्मप्राप्ती होय।

न लगे आणिक उपाय? धरी सद्‌गुरुचे पाय।।

सद्‌गुरुच्या कृपेने केवळ भक्तीमार्गच सापडत नाही; तर तो सुगमही होतो. सेवा, सत्संग आणि नामस्मरण साधनांनी परमात्म्याची अनुभूती घेता येते. जीवनात प्रेम, नम्रता, सहनशीलता, विशालता यासारखे दैवीगुण येऊ लागतात. यासाठीच संतांनी भक्तीमार्गाला प्रेमाभक्ती असेही म्हटले आहे.

चंद्रकांत जाधव
snm.jadhavca@gmail.com

भाग-३२

|| म्हणे अवतार... ||

मूळ अवतारवाणी

गुणां दा तेरे मुल्ल नहीं अणमुल्ला ए भंडार तेरा।
अणमुल्ले ने गाहक तेरे अणमुल्ला वापार तेरा।
तेरी कीमत सच्चे साहिबा कौण भला कोई कह सकदै।
लख लुकमान अरस्तु होवण भेद ना तेरा लह सकदै।
लक्खां लेख लिखे ने तेरे ग्रंथां वेद कुरानां ने।
सिफ़त करन लई ज़ोर लगाए लक्खां ही विद्वानां ने।
ब्रह्मा विशनू इन्दर सारे सिफ़त तेरी पए करदे ने।
तीरथ दान दया तप संजम तेरे दर दे बरदे ने।
बूँद निमाणी जे कर चाहे नहीं सरोवर भर सकदी।
सारी दुनियां वी जे चाहे सिफ़त नहीं तेरी कर सकदी।
बेअन्त है साहिब मेरा सिफ़त कोई की कर सकदै।
कहे अवतार मिले जो साधू छिन विच खाली भर सकदै। (प्द क्र.२६)

मराठी अनुवाद

गुण तुझे आहेत अमोलक अमोल आहे तव भांडार।
तव ग्राहकही अमोल असती अमूल्य आहे तव व्यापार।
मोल तुझे हे पूर्ण सद्गुरु कोण असा जो करु शके।
अरस्तु अन् लुकमान कुणीही भेद तुझा ना जाणू शके।
लिहूनी ठेविले लेखही लाखो कुराण वेद पुराणांनी।
कीर्ती गाता हार मानिली लाखोही विद्वानांनी।
ब्रह्मा विष्णू इंद्र देवही तुझीच गाती यशोस्तुती।
तीर्थ दान दया तप संयम तुझेच ते पाणी भरती।
तुच्छ असा जलबिंदू कधीही सागरास ना भरु शके।
सर्व जगाची शक्ती मिळूनी यशोगान ना करु शके।
अनंत आहे स्वामी माझा महिमा गाईल कोण कसा।
अवतार म्हणे या संत कृपेने क्षणात भरेल रिक्त असा। (प्द क्र.२६)

या पदामध्ये शहनशाह बाबा अवतारसिंहजी महाराज परमेश्वराचे गुणवर्णन करताना म्हणत आहेत की, हे प्रभो! तू अनमोल अशा गुणांचे भांडारच आहेस. तुझे ग्राहक म्हणजेच तुझे चाहते आणि तुझ्या नामाचा व्यापार करणाऱ्यांचे महत्वही अनमोल आहे. सगुण साकार रुप धारण केलेल्या हे सद्गुरुनाथा तुझे मोल कोण बरे करु शकेल? अरस्तु आणि लुकमान यांच्यासारख्या महान विभूती एकत्रित आल्या तरी तुझा भेद जाणू शकणार नाहीत. लाखो वेद-पुराणांनी तुझ्या बाबतीत लाखो वेद-ग्रंथ लिहून ठेवले आहेत आणि लाखो विद्वानांनी तुझ्या कीर्तीचे वर्णन करताना हार मानली आहे. ब्रह्मा, विष्णु, इंद्र आदि देवांनीही तुझेच स्तुतीगायन केले आहे. तीर्थ, दान, दया, तप यांसारख्या महान गोष्टीही तुझेच पाणी भरीत आहेत. ज्याप्रमाणे एक तुच्छ थेंब सागराला सामावून घेऊ शकत नाही तद्वत सर्व जगाची शक्ती मिळूनही तुझे यशोगान करता येणार नाही. माझा हा स्वामी अनंत असल्याने त्याचा महिमा कोणाला आणि कसा बरे गाता येईल? पण संतकृपेने रिक्त असा मनुष्यही परिपूर्ण होऊन जाईल हे मात्र निश्चितच.

ईश्वर निर्गुणही आहे, सगुणही आहे; निराकारही आहे, साकारही आहे. समर्थ रामदास स्वामींनी मनाचे श्लोक लिहिताना पहिल्याच श्लोकामध्ये म्हटले आहे-

गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा।
मूळारंभ आरंभ तो निर्गुणाचा।।

गणाधीश म्हणजे गणाचा स्वामी. गण म्हणजे लोक किंवा जीवमात्रही म्हणता येईल. त्रिगुणांपासून सृष्टीची रचना झालेली आहे. त्याचा निर्माता तो परमात्मा. पण तो स्वतः सर्वांचा आरंभ असून निर्गुण आहे, गुणातीत आहे. म्हणजेच गुणांच्या अधीन नाही, बंधनात नाही. ईश्वराचं गणित हे मोठं अवघड आहे. त्याला सगुण म्हणावं तर तो निर्गुणही आणि निर्गुण म्हणावं तर सगुणही आहे. म्हणूनच त्याचे यथार्थ वर्णन करण्यामध्ये वेद-शास्त्र-पुराणे अपूर्ण ठरली.

बरं हा सगुण रुप धारण करतो तेव्हा सर्वसामान्य माणसासारखा मनुष्य देह धारण करतो. त्यामुळे याला ओळखणे मोठे कठीन होऊन बसते. चर्मदृष्टीने पाहू जाता हा एक साधारण मनुष्य आहे अशीच धारणा बनते. ज्ञानदृष्टीचा लाभ ज्याला होतो त्याला मात्र याचे गमक उमगते. ज्ञानी भक्तच केवळ याला "गुरुः साक्षात परब्रह्म" म्हणून ओळखू लागतो.

बाबा अवतारसिंहजी महाराजांनी या पदामध्ये ईश्वराच्या दोन्ही स्वरुपांचे वर्णन केले आहे आणि देवीदेवता तसेच तीर्थ, दान,दया, तप, संयम आदि गुणही या प्रभूचीच महिमा गात असल्याचे स्पष्ट केले आहे. पण हे सगळे जरी स्तुतीगायन करीत असले तर त्याचा प्रयत्न एखाद्या तुच्छ जलबिंदुने सागराला सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.

अशाप्रकारे परमात्मा अनंत असून वर्णनातीत दयेचा सागर आहे व संतांच्या कृपेने त्याचे दर्शन होते. "संत कृपा झाली। इमारत फळा आली।" या संत वचनाप्रमाणे यःकश्चित मनुष्यही ईश्वरस्वरुप बनून जातो.

क्रमशः

- श्री. स. वि. लव्हटे
जुईनगर, नवी मुंबई

मिळून मिसळून कार्य करत असताना सत्संगात उत्साहाचा संचार करावा

दिल्लीमध्ये संपन्न झालेल्या विशेष प्रचार-प्रबंध मिटींगमध्ये सदगुरु बाबाजींचे आवाहन -

❑ **हरजीत निषादकडून**

दिल्ली, ३० एप्रिल : दिल्ली-ग्रेटर दिल्लीच्या मुखी, प्रमुख, सेक्टर इंचार्ज, संचालक आणि क्षेत्रीय संचालकांची प्रचार-प्रसार आणि प्रबंध व्यवस्थेला चांगले स्वरुप प्रदान करण्यासाठी संत निरंकारी सत्संग भवन, संत निरंकारी मंडळ, दिल्ली येथे एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्या सभेमध्ये सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज आपला पावन आशीर्वाद प्रदान करताना म्हणाले की, अभिमानरहित होऊनच सत्संगाचा उत्साह वाढविण्याचे कार्य करावे. सदगुरु बाबाजींनी प्रचार-प्रबंध संबंधित वेगवेगळ्या पैलूंवर मार्गदर्शन प्रदान आवाहन केले की.....

❖ प्रचाराची योजना मुखी, प्रमुख, सेक्टर इंचार्ज यांनी मिळून बनवावी. सुनियोजित कार्यक्रम ठेवावेत तरोच एका ठिकाणी वारंवार एकाच महापुरुषाला जाऊ न देता वेगवेगळ्या प्रचारकांचा लाभ घ्यावा या गोष्टीकडे ध्यान देणे आवश्यक आहे. सेवा वारंवार बदलत (Rotation) राहाव्यात आणि सत्संगाचा उत्साह वाढवत राहावा.

❖ जे युवक महापुरुष वेगवेगळ्या क्षेत्रात आपलं नैपुण्य दाखवून आहेत त्यांची माहिती एकत्रित करावी. जेव्हा मुखी, प्रमुख, सेक्टर इंचार्जजवळ ही माहिती (Data) उपलब्ध असेल तेव्हा मंडळ मुख्यालयासाठीही ती माहिती प्राप्त करु शकेल. नैपुण्य प्राप्त युवकांची पूर्ण माहिती एकत्रित करावी जेणेकरुन संगणक, एन.जी.ओ. इत्यादी मध्ये विशेष योग्यता असणाऱ्यांचा उचित लाभ घेतला जाऊ शकेल.

❖ दिल्लीत ज्या ठिकाणी केंद्रिय योजना आणि सल्लागार बोर्ड किंवा कार्यकारिणी समितीचे सभासद पोहचलेले नसतील तेथे त्यांचे प्रचाराचे कार्यक्रम ठेवले जावेत.

❖ दिल्लीत लोकसंख्येचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार तितकीशी साधसंगत वाढलेली नाही. साधसंगतमध्ये चांगलेपणा आणण्याची आवश्यकता आहे. प्रचारात किती उत्साह आहे, आवाज कुठपर्यंत पोहचत आहे याकडे विशेष ध्यान देऊन प्रभावशाली पध्दतीने प्रयत्न करण्याची गरज आहे.

❖ **मुंबई हे देशाचं असं शहर आहे जेथे शहराच्या दृष्टीने सर्वाधिक साधसंगत आहेत.** दिल्लीमध्ये ध्यान देणे गरजेचे आहे की, साधसंगत कशाप्रकारे वाढू शकेल? दास जेव्हा दिल्लीमध्ये असतो तेव्हा बुधवार, गुरुवारी अतिरिक्त साधसंगत द्वारा जवळपास आवाज पोचविण्याचा प्रयत्न केला जातो. दास जेव्हा दिल्लीत नसतो तेव्हा सुध्दा पॉलिसीच्या रुपात याचा स्वीकार करुन मोठ्या सेक्टरमध्ये कार्यक्रम ठेवले पाहिजेत.

❖ दिल्लीमध्ये लहान-लहान सत्संग भवन असून यातच शाळा, दवाखाना, वाचनालय इत्यादी सोबत बालसंगत, नारी सत्संग तसेच सकाळ- संध्याकाळच्या सत्संगाचे कार्यक्रम पार पाडले जातात. म्हणून सेक्टर कार्यक्रमांची रुपरेषा बनविण्याकडे विशेष ध्यान दिले जावे.

❖ शहराच्या बाह्य कमी विकसित ग्रामीण क्षेत्रात सत्संग वाढविण्याकडे ध्यान देणे आवश्यक आहे. सुशिक्षित आणि नवीन लोकांपर्यंत जाण्यासाठी कार्यालयीन सत्संगाप्रमाणे योजनाबध्द पध्दतीनुसार कार्यक्रमांचे आयोजन करावे. मिशनला पुढाकार देण्यासाठी नवतरुण आणि भगिनींना पुढे आणण्याची गरज आहे. दिल्लीमध्ये ग्राऊंड नं.८ वर जी रविवारची सत्संग होते, ती मोठ्या प्रमाणात झाली पाहिजे. जर सत्संग हॉलला मापदंड मानलं तर प्रत्येक क्षेत्रात आणखी योगदान देण्याची गरज आहे. या वेगात ढिलेपणा येऊ देऊ नये.

❖ **सत्संगात वेळेचं पालन (Punctuality) अवश्य केलं जावं. काही वेळा संगतची वेळ बरीच लांबवली जाते. भगिनी-मुलांना घरी जायचं असतं. म्हणून सत्संगाची वेळ अधिक वाढणार नाही याबाबत सावध राहावे.**

❖ स्टेजचे विचार, सेक्रेटरी, अकाऊन्ट, कॅश इत्यादी

सेवांच्या नियमांचे पूर्णपणे पालन करावे.

❖आपसातील वितुष्टाच्या परिस्थितीला वेळीच सांभाळणे गरजेचे आहे. कारण याचा विस्तार होऊ नये. काही वेळा आपला हट्ट आणि अभिमानाच्या कारणास्तव जी गोष्ट वेळ असतानाच संपविली जाऊ शकते ती बिघडू शकते. यात सावधानी आणण्याची आवश्यकता आहे.

❖ आपलं जीवन स्वच्छ असावं. चारित्र्य, आचरण, व्यवहार सुंदर असायला हवा. कोणतेही असे काम करु नये ज्यामुळे मिशनकडे बोट उचलले जाईल.

❖ **सर्वांनी वाचनाची आवड विकसित करावी. मिशनच्या पत्र-पत्रिका आणि साहित्य अवश्य वाचावे. याबाबत लोकांना मिशनच्या बद्दल सल्ला-चर्चा करायला मदत होईल. स्थानिक सत्संगात जेथे कौटुंबिक वातावरण असतं तेथे संत निरंकारी, एक नजर, हसती दुनियाचे सभासदत्व आणि विक्री हेतु तसेच बिल्डींग फंड वाढविण्याकडे विशेष ध्यान देण्याची गरज आहे. स्थानिक सत्संगात याबद्दल निवेदन करणे आवश्यक आहे.**

❖ पत्रिका-प्रकाशन सत्संगात पर्यायी डिस्प्ले (प्रगटीकरण) व्हायला पाहिजे. कितीतरी कार्यक्रमात नातेवाईक, परिचित येत असतात, त्यामुळे असे लोक तेथून पत्रिका- साहित्य घेऊन जाऊ शकतील. याचा प्रचाराचे साधन म्हणून भरपूर उपयोग केला जावा. तरुणांना पुढे आणून प्रत्येक ठिकाणी पत्रिका-प्रकाशन सेलची व्यवस्था केली जावी. ब्रँच, भवन आणि कार्यक्रमात यांची उपलब्धी सुनिश्चित केली जावी.

❖ आपल्या जवळपास राहणारे लोक अध्यात्माबाबत आवड ठेवत असतील तर त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना आमंत्रित करु शकता. विशेषतः रविवारच्या सत्संगमध्ये तसेच दिव्य यात्रा-सरोवर परिसरात येणाऱ्या समाजातील लोकांबरोबर संपर्क वाढविणे आवश्यक आहे.

❖ प्रचाराच्या सत्संगातील वातावरण अवश्य नियमित (Regular) सत्संगाप्रमाणे असायला पाहिजे. सामाजिक व्यवहारकडे साधसंगतला सावध करायला पाहिजे. देवाण-घेवाण इत्यादी अमर्यादित व्यवहार कदापिही होऊ देऊ नयेत.

❖ निरनिराळ्या सामाजिक सेवा कार्यामुळे मिशनच्या प्रसिध्दीमध्ये वाढ होत आहे. रक्तदान शिबिरं, आरोग्य शिबिरं आणि इतर समाजकल्याण कार्यामुळे लोकांना लाभ होत असून त्यामुळे लोक मिशनच्या जवळ येत आहेत. समाजकल्याण कार्यात वाढ करण्याची आवश्यकता आहे.

❖ मिशनच्या निरनिराळ्या कार्यामध्ये ताळमेळ आवश्यक आहे. निळे पुस्तक (Blue Book), सेवादल नियमावली (Sewadal Rules) आणि लेखा-जोखा नियमावली (Accounts Manual) मध्ये जे निर्देश देण्यात आले आहेत, त्यात ताळमेळाचा उल्लेख असून त्या आदेशांचं पूर्णपणे पालन करावे. मुखी, प्रमुख आणि सेवादल अधिकाऱ्यांनी आपल्या कक्षेत राहून बुध्दिमत्तापूर्वक कार्य करावं, ताळमेळ बनवून ठेवावा. ध्यानात ठेवावं की, सकल विश्वात वेळेनुसार Issues (विषय) आणि Duties (सेवेत) परिवर्तन होत असतं. सोबत कार्याचं मूल्यांकन सुध्दा होत राहतं. आदेशांचं पालन न केल्याने कधी-कधी जबाबदाऱ्यात परिवर्तन (Changes) होऊ शकतं. निर्णय हे पार पाडण्यासाठीच असतात म्हणून स्थानिक स्तरावर ध्यानात ठेवावं की, मनमर्जीने कोणतीही गोष्ट होऊ नये.

❖ आपण आपली भाषा आणि व्यवहार गुरुमतानुसारच ठेवावा. कटू बोल कदापिही बोलू नयेत. काही जबाबदारी मिळाली म्हणून भाषा आणि स्वभाव बदलला असं होता कामा नये.

❖ स्थानिक पातळीवर वारंवार लंगर करु नयेत. चढ-उताराच्या प्रसंगाव्यतिरिक्त जन्मदिवस, विवाह, पदोन्नती इत्यादी आनंदाच्या प्रसंगी सर्वांनी मिळून महिन्याचा एक दिवस निर्धारित करुन संयुक्त लंगर ठेऊन आनंद साजरा करु शकता.

❖ दाराला सत्संगानंतर घरोघरी चरण टाकण्याची विनंती केली जाते. चढ-उताराच्या प्रसंगी सहानुभूती व्यतिरिक्त आता अशाप्रकारे घरोघरी चरण टाकणे शक्य होत नाही म्हणून अशा गोष्टी टाळायला हव्यात.

❖ आंतरराष्ट्रीय समागम, बर्मिंगहॅम (यू.के.) साठी साधसंगतमध्ये मोठा उत्साह दिसून येतोय. महापुरुष तर प्रसंगाच्या शोधातच असतात आणि संधी मिळताच उत्साहपूर्वक पुढे होतात.

शेवटी श्री. सी.एल.गुलाटी, सचिव (मुख्यालय) यांनी सदगुरु बाबाजींचे आभार व्यक्त करुन ते म्हणाले की, सदगुरुचे प्रत्येक वचन गुरसिखसाठी कायदाच असतो. म्हणून याला जशास तसं स्वीकारुन टीकाकार न बनता स्वीकारायचं आहे. यात कोणत्याही प्रकारची ढिलाई असता कामा नये आणि टिकाकार ही बनायचं नाही.

मातृवचनामृत

संतजनांनो! भक्त सदैवच सद्गुरुवर आपला विश्वास ठेवून आपल्या जीवनाला पुढ्यात पुढे घेऊन जातो. जसं म्हटलं आहे, 'अग्गां को तांग पिछां फिर न मुडना' अर्थात पुढ्यात पुढे पाऊल टाकायचं मागे कदापिही ठेवायचं नाही. हीच भावना संत-महापुरुषांची असते आणि जो या भावनेला घेऊन चालतो, त्याची सर्व कार्ये पूर्ण होतात. जसं वाचतो की,

सन्तां दे कारज आप खलोया हर कम करावण आया।

त्यांची सर्व कामं सद्गुरु पूर्ण करतात. आपण आपल्या अंतःकरणात डोकावून पाहायचं आहे की, आमचा गुरुवर किती विश्वास आहे? कुठे आम्ही तोंडाने गुरुचं नामस्मरण तर करत नाही ना? काय आपल्या हृदयात गुरुचा समावेश झाला आहे की नाही, काय हा आपल्या रोम-रोमात आहे किंवा फक्त जिभेपर्यंतच. आपण आपापल्या हृदयांत डोकावून पाहायचं आहे कारण आपलं मन सोबत साक्ष देतच जातो. जेव्हा आपण प्रेमात असतो तेव्हाही मन साक्ष देत असतं आणि जेव्हा आपल्यामध्ये एखादी घृणा, एखादी देषभावना येते, तेव्हाही मनानं सोबतच यायचं असतं.

साधसंगतजी! हे मन फारच चलाख असल्यानं याला माकड सुध्दा म्हटलं गेलं आहे. आपण पाहिलं सुध्दा असेल की, माकड कधीही आरामात बसत नाही. कधी इकडे पळतो, कधी तिकडे पळतो. कधी झाडावर चढतो, तर कधी भिंतीवर जाऊन बसतो. मात्र जेव्हा ते माकड एखाद्या नाचणाऱ्याच्या हातात लागतं तेव्हा मात्र तो जसा नाचतो तसं माकडही नाचतं. जर मदारी(नाचगारा) त्याच्या डोक्यावर एखादी काठी ठेवल्यास ती सुध्दा आपल्या खांद्यावर घेऊन चालतो आणि जर त्याच्या डोक्यावर एखादं ओझं ठेवल्यास तर ते सुध्दा उचलून घेतो. मदाऱ्याला माहीत असतं की, त्यानं (माकडानं) आरामात बसायचं नाही, त्याला कोणत्या ना कोणत्या तरी कामात गुंतवून ठेवायचं.

याचप्रमाणे मनाचीही अवस्था आहे. हा कधी तर फारच सज्जन बनतो आणि कधी तर पक्का वैरीही बनतो. आपण मनाच्या सर्व अवस्था जाणता, कारण हा सर्वांच्या

आतमध्ये बसलेला आहे. जेव्हा हे मन प्रेमाच्या अंतर्गत असतं आणि त्यावेळी कोणीतरी आपल्याला अशी एखादी गोष्ट सांगतो तेव्हाही आपण हसत-खेळत, आनंदाने मान्य करतो आणि जर आपल्या हृदयात कोणाप्रति दुःख असेल, एखादी वाईट भावना असेल तर तो एखादी चांगली गोष्ट जरी म्हणाला तरी ती आपल्याला चांगली वाटत नाही. पंजाबीची एक म्हण आहे,

भांदी दा सब कुझ भावे न भांदी दा कुझ न भावै।

संतजनांनो! जे गुरुवाले असतात, ज्यांच्या मस्तकावर गुरुचा हात असतो; ते कधीही मनाच्या मागून चालत नाहीत तर मनाला आपल्या मागाहून चालायला लावतात. संताचं हे मोठेपण असतं की, ते मनाला वश करुन घेतात. या मनाची अवस्था आपण जागतच असता की, हे मन कधीही टिकून बसत नाही आणि कोणालाही बसूही देत नाही. म्हणून तर भक्त सदैव प्रार्थना करत राहतात की, हे प्रभू! अशा संतांचं मिलन व्हावं ज्यांच्या मिलनामुळे तुझं नाव जागृत राहतं. अशा लोकांची भेट न व्हावी जे घसरतात आणि आम्हालाही तसं करण्यास प्रवृत्त करतील. हे जग फारच गुळगुळीत आहे. आपण सर्वजण जाणताच की, जर घरात किंवा रस्त्यावर कुठे गुळगुळीतपणा असल्यास तेथे पडण्याची, घसरण्याची

शक्यता असते. आम्ही घरात पडावं किंवा बाहेर पडावं, पडायचं तर पडायचच आहे.

याप्रमाणेच हे जगसुध्दा गुळगुळीतपणा सारखं आहे. यात क्षणोक्षणी पडणे किंवा घसरण्याची भीती असते, परंतु सद्गुरुला जे आपला आधार आणि आसरा मानतात त्यांची या घसरगुंडीपासून सद्गुरु सुरक्षा करतात; परंतु तिथे मात्र एकच अट असते की आमचा विश्वास पूर्ण असावा. ज्यावेळी हे मन घसरेल, कोसळण्याकडे जाईल त्यावेळी कित्येकदा शिष्य हाच विचार करतो की, गुरुने वाचविलं का नाही? जर शिष्याला आपला खरेपणा नसेल, तर गुरु तरी काय करणार.

संतजनांनो! आपण पाहिलं आहे की, जर आपण हातात बांबू घेतला आणि त्याच्यात कितीही हवा फुंकली तरी हवा एकीकडून दुसरीकडे जात नाही कारण त्याच्यात गाठ पडलेली असते. याचप्रमाणे आपली कर्मही अशीच असतात जी आपल्याला गुरुपासून दूर घेऊन जातात. म्हणून भक्त प्रत्येक समयी अरदास करतात, प्रार्थना करतात की, दातार जर तू आमच्या जीवनात आला आहेस तर हे जीवन असंच बनावं, कारण हे जीवन वारंवार मिळत नाही. म्हटलंही आहे,

कई जन्मां दे बाद चोला पाया वेखीं इसनूं दाग न लाई।

न जाणो कितीतरी जन्मानंतर हा मनुष्यजन्म मिळाला आहे, याचा आपल्याला सांभाळ करायचा आहे आणि कुठेही डाग लावायचा नाही. गुरुगोविंदसिंहजी महाराजांच्या त्या काळातील त्यांच्या चाळीस शिष्यांची आपण नावं ऐकलेली आहेत. जेव्हा युध्द होत होते त्यावेळी ते घाबरले आणि गुरुला त्यांनी लिहून दिले की, आजपासून आम्ही आपले शिष्य नाही आणि आपण आमचे गुरु नाही. जेव्हा ते सर्व आपापल्या घरी गेले तेव्हा त्यांच्या बायका ओरडून म्हणाल्या, आपण यावेळी का आलात? यावेळी तर गुरुसाहेबांना आपली गरज आहे. ते म्हणाले की, आम्ही तर लिहून दिलं आहे की ना तू आमचा गुरु आहेस ना आम्ही आपले शिष्य आहोत. हे ऐकून त्यांच्या बायकांना राग येऊन त्या म्हणाल्या, "आपण भित्रे आहात, मृत्यूला घाबरला आहात. आपण घरी बसून रहा, तुमच्या ऐवजी आम्ही जातो. कारण गुरुसाठी प्राणाचं बलिदान द्यायची हीच वेळ आहे." हे ऐकून सर्व चाळीसच्या चाळीस शीख परत (गुरुकडे) निघून गेले आणि हुतात्मा झाले. गुरुसाहिबने त्यांना पाहिलं तेव्हा कोणीतरी म्हणालं की, हा माझा दहा हजारी शिष्य आहे, हा माझा वीस हजारी शिष्य आहे. त्यांचे सरदार महासिंहजींचे अजूनही अंतिम श्वास शिल्लक होते. गुरुसाहिब त्यांच्याजवळ जाऊन म्हणाले, "बोला! काय मागता ते मागा?" तेव्हा हात जोडून महासिंह म्हणाले की, हे दातार! ती चिठ्ठी फाडून टाका जी आम्ही स्वतः लिहून दिली होती.

इतिहास साक्षी आहे की, सद्गुरुने तर ती चिठ्ठी फाडली सुध्दा, परंतु आजपर्यंत त्यांच्या नावासह ती गोष्ट चर्चेला येत आहे. ज्याप्रमाणे एखादा कपडा फाटतो तेव्हा त्याच्यावर आम्ही दुसऱ्या कापडाचं ठिगळ लावतो. आपलं शरीर तर झाकलं जातं, परंतु कपड्यावर लावलेलं ठिगळ मात्र सर्वांच्या नजरेस येतं. जो या गोष्टींना आपल्या हृदयामध्ये स्थापित करतो, तो कधीही डळमळीत होत नाही. भलेही कधी हिवाळा येवो, कधी उन्हाळा येवो, कधी दिवस येवो, कधी रात्र येवो, कधी सोसाट्याचे वारे येवोत, कधी पावसाळा येवो, कधी दुष्काळ येवो; भावार्थ हाच की वातावरण आणि ऋतू तर बदलत राहतात, परंतु भक्त मात्र यांच्यासोबत कधीही बदलत नाही. आपला विश्वास कायम ठेवतात. आपल्या गुरुच्या सोबत पावलावर पाऊल टाकून चालू लागतात. आपल्या खरेपणा आणि विश्वासाला नेहमी वाढवत जातात.

संतजनांनो, गुरुच्या कृपेनेच सत्संगात बोललं जाऊ शकतं. जर मनुष्य म्हणेल की, मी काही बोलू शकतो किंवा काही लिहू शकतो, तर मनुष्य स्वतःहून काहीच करु शकत नाही. हा प्रभू परमात्मा जेव्हा हातांना शक्ती देईल तेव्हाच लिहू शकतो, जिभेला शक्ती देईल तेव्हाच बोलू शकतो, पायांना शक्ती देईल तेव्हाच चालू शकतो. भक्ताचा आपल्या सद्गुरुवर एवढा विश्वास असतो की, त्याबद्दल महात्मा नेहमीच एक उदाहरण ठेवतात की एकदा घोड्यावरुन दोन प्रवासी जात होते. एकाने दुसऱ्याला विचारले की, आपल्या घोड्याचे पाय किती आहेत? त्याचवेळी तो घोड्यावरुन खाली उतरला आणि पाय मोजू लागला....एक, दोन, तीन, चार!

(पान १२ वर)

विवेक विचारधारेचा अनमोल खजिना

(मागील अंकावरुन पुढे)

जगात चुकीचं काहीही नाही. जगात जे काही केलं जात आहे ते भक्ती भावनेने केलं जात आहे, त्याला आम्ही चुकीचं म्हणू शकत नाही. कोणी मूर्तीपूजा करत आहे. आपल्या अंदाजानुसार सत्संगमध्ये एखाद्या विशिष्ठ ठिकाणी बसून आपली भावना व्यक्त करतो. कोणाच्या मनाच्या भक्तीचं रुप वेगळं आहे, त्याला आपण चुकीचं म्हणू शकत नाही. कारण त्यात भावना अतिशय चांगली आहे. फक्त हे म्हणू शकतो की, हा भक्तीचा मार्ग आहे. ही भक्ती करण्याची आपापली पध्दत आहे. ही तर मार्गाची गोष्ट आहे. अंतिम मुक्कामाची नाही. फक्त येथे हा फरक पडतो की, वर्षानुवर्षे हे कार्य मी करत आहे. एकाच प्रकारची भक्ती करत असून तिलाच आपले निश्चित ठिकाण मानले आहे. नाही साधसंगतजी! ती भक्ती माझ्या भावनेला दृढ करील ही चांगली गोष्ट आहे. माझ्या मनाचा जो शोध आहे त्याला आणखी प्रबळ करेल ही चांगली गोष्ट आहे. त्या भक्तीविना, त्या भक्तीच्या जोरावर नी हा शोध चालू ठेवेन आणि जोपर्यंत या परमात्म्याला प्राप्त करत नाही तोपर्यंत मी आरामात बसणार नाही ही गोष्ट चांगली आहे. ही भक्ती माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. संतजनांनो मी भक्ती यासाठी करत आहे की, आमच्या घरात वाडवडिलांपासून हेच होत आहे. एक मूर्ती सजवून ठेवली आहे. आमचे आजोबा याची पूजा करतात आणि वडीलही करत आहेत. म्हणून आम्हीही करणार. मग लोक काय म्हणतील? मग मी चुकीचे करत आहे. मग नी समजलो नाही की, भक्ती म्हणजे काय आहे? मी भक्ती ही भक्ती करण्यासाठी करीत नाही, भक्ती तर माझ्या घराण्याची रीत पार पाडण्यासाठी करत आहे. परमात्म्याची इच्छा प्रबळ करण्यासाठी मी भक्ती करीत नाही. मी भक्ती यासाठी करत आहे की, लोकांनी मला म्हणावे ठीक आहे भाऊ! याचे वडील करत होते म्हणून हा देखील करत आहे. परंतु सर्वात मोठी गोष्ट अशी आहे की, जो नियम जगाच्या कोणत्याही प्रकारच्या भक्तीला लागू होतो, तोच नियम या सत्संगालाही लागू होतो. सत्संगात सर्वजण यासाठी येतात की, आई-वडील निरंकारी आहेत, भाऊ सत्संगाला जातात. आम्ही नाही गेलो तर आई-वडील नाराज होतील. सत्संगाला जावंच लागणार. ते सुध्दा तेच काम करीत आहेत ज्याचं खंडण केलं जात आहे. ते सुध्दा चुकीचंच करत आहेत. असं नाही की पध्दतीनुसार नी मंदिरात जातोय ते चुकीचं आहे, निरंकारी भवनमध्ये येणे हे ठीक आहे. असं नाही की पध्दती नुसार गुरद्वारात जात आहे तर ते चुकीचं आहे आणि निरंकारी भवनमध्ये येतो हे ठीक आहे. नाही! साधसंगत असं नाही. भक्तीभावनेने मी कोणत्याही ठिकाणी जातो. परमात्मा तर प्रत्येक ठिकाणी आहे. माझी भावना चुकीची होते आणि भक्तिरहित निरंकारी भवनमध्ये भले रोज सत्संग करण्यास जाईन, एका दिनचर्येनुसार जाईन की, ठीक आहे भाऊ! जायला पाहिजे. सर्व लोक जायला पाहिजे असं म्हणतात म्हणून मी येतो. तर नी तिथून कोणताही फायदा घेऊन तर येणार नाही. हे आम्ही चार शब्द बदलले, आम्ही चार भिंती बदलल्या, बाहेरुन सर्व काही बदललं मात्र आतून कधी बदलणार. ज्यादिवशी अंतरंगातून बदलून जाऊ, बाहेरुन बदलण्याची कोणतीही गरज पडणार नाही. बाहेरची वस्त्र-प्रावरणं, बाहेरची छायचित्र केवळ जगाला दाखविण्यासाठी असतात. चांगली गोष्ट आहे की, ते बाहेरचे आमचे चित्र चांगले असावे. हे नाही म्हणणार की, बाहेरील चित्र खराब ठेवा म्हणून. आपण जाणताच की, एका दुकानात जर सामान चांगले असल्यास दुकानदाराला कोणतीही विशेष अशी भीती नसते की, बाहेरुन दुकान मैलं आहे किंवा कसंही आहे. त्याला माहीत आहे की, दुकानातील सामान ठिक आहे. माझ्याजवळ तर माझी गिऱ्हाईकं येणारच. परंतु किती चांगलं होईल की, तो आपलं दुकान बाहेरुनही स्वच्छ आणि सुधरवूं शकेल. अहो, मालापर्यंत किंवा सामानापर्यंत अगोदर पोहोचणार नाही. अगोदर तो दुकान बाहेरुन पाहिल की, दिसायला ते कसं दिसत आहे. तो दुकानाच्या

सौंदर्याकडे आकर्षित होऊन दुकानात येईल आणि पुढे सामानही चांगलं मिळाल्यास तर कमालच होऊन जाईल. जर उंच दुकान आणि फिक्क पक्वान असेल तर कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही, परंतु जर पक्वान्न स्वादिष्ठ असेल आणि दुकानही चांगलं असल्यास त्यात चूक कोणती, समस्या कोणती आहे? आजपर्यंत पंजाबी भाषेतील एक म्हण 'पल्ले होवे राच तो कोठे चढ के नच' ऐकली आहे की, ज्याच्याजवळ सत्य आहे त्याला कोणती पर्वा आहे. मग तो छपरावर नाचो किंवा दवंडी पिटवो, त्याला कोणता फरक पडणार आहे. परंतु आपल्याजवळ सत्य कायम असेल, आपला व्यवहारही चांगला असेल तर ही गोष्ट कोणापासूनही लपलेली नाही हे तर सदगुरुने आपल्याला सांगितले आहेच. सदगुरु बाबाजींनी सदैव आपल्याला नम्रतेचा, प्रेमाचा, सत्काराचा उपदेश दिला आहे. जो कोणाबरोबर प्रेम करतो तोच प्रेमाचा अधिकारी असतो. जे आपण इच्छिता की, लोकांनी आपल्यासोबत प्रेम करावं. तेच प्रेम अगोदर इतर लोकांशी आपण सुरु करा. मी तर कोणाचा सत्कार करणार नाही आणि माझा सत्कार मात्र सर्वांनी करावा असं मी इच्छित असेन, तर हे मात्र ठीक नाही. ठीक आहे, मी एखाद्या उच्च अधिकारपदावर बसलेलो आहे तर घाबरुन लोकांनी माझा सत्कार करावा? परंतु कुठपर्यंत? जोपर्यंत ती खुर्ची आहे, जोपर्यंत ते अधिकारपद आहे तोपर्यंत. ताकदीने जे राज्य केलं जातं ती फक्त वेळच असते आणि प्रेमाने जो हृदयांवर राज्य करतो ते ताकदीचे इच्छूक नसतात, खुर्चीचेही इच्छूक नसतात. त्यांची प्रत्येक हृदयामध्ये इज्जत भरलेली असते, प्रत्येक हृदयामध्ये त्यांच्यासाठी प्रेमच असतं. ते जमिनीवर बसूनही प्रेमासाठी उपयुक्त असतात, ते सिंहासनावर बसले तरी प्रेमासाठी उपयुक्त असतात. सदगुरुदेवांनी असा रस्ता दाखवला आहे, अशी सुंदर पध्दत दाखविली आहे ज्यामुळे कधीही मन विचलित न व्हावं, ज्यामुळे एकरस जीवन व्यतीत व्हावं. कृपा करा, दया करा. आपण महात्मा लोक आहात. संतजनांनो! भक्त महात्मा असे असतात की, ते जिथे जातील तिथे काही सांगण्याची आवश्यकता वाटत नाही. तिथे आपणहून हा सुगंध दरवळत जातो. कृपा करा, जोपर्यंत आमच्या जीवनात ते परिवर्तन येत नाही, जोपर्यंत आमचं जीवन सदगुरुच्या आदेशानुसार चालत नाही तोपर्यंत गोष्टी कितीही चांगल्या असोत, कुठपर्यंतही पोहचा, युक्तिवाद कितीही चांगला करा; परंतु परिणाम होणार नाही. आपल्या निरंकारी मिशनचे एक फारच विद्वान महात्मा-वक्ता निर्मल जोशीजी आहेत, त्यांनी ही गोष्ट सांगितली. कदाचित ही गोष्ट बाबा गुरबचनसिंहजींच्या काळातील असावी किंवा कदाचित शहनशाहजींच्या काळातील जुनी गोष्ट असावी, दासच्या तर ध्यानातही येत नाही. तर सदगुरु बाबाजींजवळ जाऊन निर्मल जोशीजींनी विचारले, महाराज! एक गोष्ट ध्यानात येत नाही की, जेव्हा आम्ही सत्संगात उभे राहून बोलतो तेव्हा कोणी आपापसात गोष्टी बोलत असतो, कोणी उठत असतो, कोणी बसून राहिलेला असतो, कोणी जात असतो, कोणी येत असतो, कोणी बोलण्याकडे अर्धे ध्यान देत असतात, कोणी अर्धेही ध्यानच देत नाहीत. मात्र आम्ही फारच विचार करुन बोलत असतो, मोठा युक्तिवाद करत असतो. फार चांगली गोष्ट सांगतो, परंतु ती गोष्ट चांगल्या तऱ्हेने फिरवून सांगितल्यास तर ती आणखी चांगली वाटेल. याच्यात आणखी चार शब्द जोडल्यास आणखी जास्त मजा येईल. फारच मसाला लावून काही गोष्टी सांगतो तेव्हा काही लोक अर्धेच ऐकतात आणि काही लोक ऐकतच नाहीत. जेव्हा आपण विचार करता तेव्हा आपले साधारण शब्द असतात. सरळ साध्या गोष्टी असतात. त्यात एखादी मनोरंजक गोष्ट नसते. सरळ साध्या शब्दात आपण गोष्ट सांगून मोकळे होता, तरीही शांत होऊन लाखो-लाखो लोक आपले विचार ऐकत राहतात? असं का? बाबाजी प्रथम हंसले नंतर म्हणू लागले, नाही नाही जोशीसाहेब असा विचार करु नका? ते लोक आपल्या गोष्टी ऐकतात. नाही नाही महाराज कृपा करा, बाबाजी कृपा करा, या गोष्टीचं उत्तर द्या.

क्रमशः ...

सौ. सरीता नयन तळवडेकर
(कुर्ला, मुंबई)

अनुभवाचे बोल

सद्गुरु आहे ना!

एका महापुरुषाने एका प्रचारक महात्म्याला आपल्या घरी चरणस्पर्श करण्याची विनंती केली. महात्मा घरी दाखल झाले. पति-पत्नीने त्यांची खूपच सेवा केली. परिवारातील इतर सभासदही सेवेमध्ये भरपूर सहयोग देत होते. जेवण जेवल्यानंतर महात्माजींनी दांपत्याला विचारले, "बऱ्याच वेळेपासून आपल्या घरी आहे. मी पाहत आहे की, अशी कोणती गोष्ट आहे की आपल्या चेहऱ्यावर उदासीनता दिसत आहे."

पति म्हणाले,"महात्माजी! मला तीन मुली आहेत. मोठी मुलगी शहाणी झाली आहे. तिचं लग्नं कसं होणार हीच चिंता आम्हाला खात आहे." महात्म्यांनी विचारले की, कुठे आहे आपली मोठी मुलगी? आई-वडिलांनी तिला बोलावून घेतले आणि सांगितले, "महात्माजी, ही आहे आमची मोठी मुलगी." त्यावर महात्माजी म्हणाले, "अरे, जेव्हापासून मी तुमच्या घरात आलो आहे तेव्हापासून ही मुलगी अगदी आनंदाने सेवा करताना दिसतेय. हीच्या चेहऱ्यावर तर लग्नाची कोणतीही चिंता मला दिसून येत नाही." तेव्हा त्या मुलीचे वडील म्हणाले, "महात्माजी! हीला चिंता करण्याचे कारणच काय? आम्ही दोघेही आहोत ना." तेव्हा महात्माजी म्हणाले, "चांगलं आहे. मग तर तुम्हा दोघांनाही चिंता करण्याची आवश्यकता नाही. निराकाराचे साकार रुप सद्गुरु आहेत ना. संपूर्ण अवतार वाणीतील पद संख्या २६४ मधील ही ओळ विसरलात काय...**ज्याला याचा मिळे आसरा काम न त्याचे अडू शके।**"

हे ऐकून पति-पत्नी चकितच झाले. महात्माजी तर योग्यच म्हणत आहेत. आई-वडील तर मुलांच्या प्रत्येक आवश्यकतेचा विचार करतातच. मुलांच्या मस्तकावर आई-वडिलांचे कृपाछत्र असल्याने ती निश्चितच राहतात. आमच्याही मस्तकावर सद्गुरुचा हात आहे, मग आम्हीही चिंता का करत बसावी? फक्त चिंता केल्यानेच आजपर्यंत कोणाचे एखादे काम झाले आहे का? जे काम आमचेही बनेल.

खरोखरच, चिंतेची आवड पाळणे फारच महागडी ठरते. चिंता जेव्हा डोक्यात घर करुन राहते तेव्हा तिचे नातेवाईकही न बोलावता घरात ठाण मांडून बसतात. हे नातेवाईक आहेत...डोकेदुःखी, घाबरणे, झोप न येणे, शारीरिक थकवा, हृदयरोग, अल्सर, मधुमेह, चेहऱ्यावर सुरकुत्या पडणे, केसांचं अवेळी गळणे आणि पांढरे होणं इत्यादी. चिंता एक असा चोर आहे जो माणसाची हिंमत, खुशी आणि आस्था चोरुन नेतो. याबाबत सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी म्हणत आहेत...**चिता तर मुडद्याला जाळून टाकते, परंतु चिंता मात्र जिवंत मनुष्यालाही जाळून टाकत असते. म्हणून संत मात्र चिंता कधीच करत नाहीत. होय चेतनेला मात्र अवश्य धारण करतात.**

चिंता न करण्याचा अर्थ असा होत नाही की, हातावर हात धरुन आळशी बनून बसावं. काम करण्यापूर्वी विचारविनिमय करायचा आहे, योजना देखील बनवायची आहे आणि कामाची पूर्ण तयारी सुध्दा करायची आहे. योग्य दिशेने तर कर्म करायचं आहे, परंतु न जाणो कसे होईल, केव्हा होईल, माहीत नाही कोणत्या अडीअडचणी येतील हा विचार करायचाच नाही. त्याची गरजच नाही. हा तणाव मानसिक शांती चोरुन नेतो. या तणावापासून वाचणे गरजेचे आहे. कर्म करतेवेळी मनामध्ये हाच भाव बनून रहावा की, हे

सदगुरु! सर्व काही करणारे आपणच आहात आणि करवून घेणारेही आपणच आहात. कोणत्या घटात बसून कोणते काम आधी करुन घ्यायचे आहे, हे फक्त आपणच जाणता. जर आपण आपल्या चरणाशी जोडून ठेवले आहे, तर सर्व कार्य आपणच पूर्ण करायची आहेत. बस फक्त आपल्यावरचा विश्वास आमच्या अखेरच्या श्वासापर्यंत बनून रहावा. निरंकारी राजमाताजी देखील समजावून सांगतात की, **हा दातार प्रभू तर आपली सर्वच कामं पूर्ण करतो. मात्र अट अशी आहे की, आमचा विश्वास पूर्ण असावा आणि आमचं मन कधीही डळमळीत होऊ नये. जेव्हा आम्ही डळमळीत होतो आणि मनात शंका ठेवतो की, माहीत नाही हे काम होईल की नाही. तेव्हा प्रभू सुध्दा काय करु शकेल? आम्ही आपला विश्वास पूर्ण ठेवावा आणि खऱ्या हृदयाने ही प्रार्थना करत रहावी की, हे प्रभू! माझं सुख-दुःख सर्व तुझ्या हातात आहे. तेव्हा हा प्रभू आमची प्रत्येक आवश्यकता पूर्ण करतो.**

यासाठी आम्ही प्रत्येक वेळी आठवणीत ठेवायचं आहे की, आपण चिंता करायची नाही, सदगुरु आहे ना आपल्याबरोबर. जर चुकून हे मन चिंता करण्याकडे पळेल तर त्याला प्रभू नामस्मरणात गुंतवा.

जे सदगुरुवर आपला विश्वास पूर्ण ठेवतात,
त्यांची कठीण कार्यदेखील सहज-सोपी होतात

...निरंकारी राजमाताजी

श्री. विकास अरोरा
(रेवाडी, हरियाणा)
marathivikas@rediff.com

मातृवचनामृत (पान ८ वरुन)

विचारणाऱ्याने विचारले की, आपण किती वर्षे प्रवास करता? त्या घोडेवाल्याने सांगितले, कितीतरी वर्षापासून. विचारणाऱ्याने पुन्हा विचारले, आतापर्यंत तुम्हाला माहीत नाही घोड्याला किती पाय असतात ते? घोडेवाला म्हणाला, "माझ्या साहेबाचा काय भरवसा? चाराचे तीनसुध्दा करु शकतो आणि चाराचे पाच सुध्दा करु शकतो." भक्ताचा हा असा विश्वास असतो, तो आपलं एकेक पाऊल सदगुरुच्या आधारेच टाकतो. आपण या विश्वासाच्या या पौराणिक कथा फक्त ऐकायच्या नाहीत, तर मनात स्थापित करायच्या आहेत.

एक गुरुसिख जो लंगरसाठी जंगलातून लाकुडफाटा घेऊन येत असे आणि लंगरमध्ये उष्टया थाळीतला शिल्लक राहिलेला प्रसाद खाऊन टाकत असे. एके दिवशी गुरुसाहिबने तेथून जाताना त्याला खाताना पाहिले. गुरुसाहिब म्हणाले, ऐक भाऊ महात्मा! प्रसाद खात आहेस? गुरुसिख म्हणाला, महाराज! मी तर उष्टे एकत्रित करुन खात आहे. लंगरसाठी लाकडं घेऊन आलो होतो आणि विचार केला की, लंगर खाऊ या. गुरुसाहिब म्हणाले, तू जितकी सेवा केलीस ती तर लंगरने खाल्ली, मग तुझी सेवा कोणती झाली? दुसऱ्या दिवशी त्याने लाकडांचे दोन गट्ठे एकत्रित केले. एक लंगरसाठी दिला आणि दुसरा बाजारात विकून आपले पोट भरले. भावार्थ हाच की, सेवेची पध्दत सुध्दा स्वतः सदगुरुच शिकवतात. जसं लिहिलं आहे,

अपनी सेवा आप करावे जित ते होय दयाला

ज्याच्यावर याची कृपादृष्टी होते त्याच्याकडून हा स्वतः सेवा करवून घेतो, नाही तर जर आपण म्हणू या की आपण काही सेवा करु शकतो, तर आपल्या अधिकारात काहीही नाही. जर आपल्याला काही देतच नसेल, तर आपण काय करू शकतो? भाकरीसाठीही मग लाचार बनतो. म्हणून भक्त अभिमानरहित होऊन, कर्ता भाव त्यागून गुरुच्या दरबारात सेवा-सिमरण-सत्संग करत राहतो.

- निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी

आध्यात्मिकतेची वाट - भ्रष्टाचारापासून दूर राहो

वाचायला सुरुवात करताना अवघडल्यासारखं वाटत आहे ना? आध्यात्मिकतेत, भक्तीमार्गात भ्रष्टाचाराचा विषय आला कुठून? शीर्षक वाचून मनात बरेच खल सुरु झाले असतील, खरंय ना? भक्तीमार्ग हा शिष्टाचाराचा राजमार्ग आहे, भ्रष्टाचाराच्या अवखळ वाटेला भक्तीमार्ग कसा जाईल? आध्यात्मिकता हा श्रेष्ठाचाराचा सोनेरी कळस आहे, तेथे भ्रष्टाचाराच्या कुरुप पायतानाला कसे स्थान मिळेल? भ्रष्टाचार या संकल्पनेचं अवलोकन केल्यास आपल्या लक्षात येईल की, आजमितीला भारतवर्षात घरा-घरात चर्चीला जाणारा विषय म्हणजे भ्रष्टाचार! लहान थोरांच्या मुखी याच विषयाची चर्चा आहे. सर्व म्हणत आहेत की, या आर्थिक, सामाजिक तथा राजकीय भ्रष्टाचाराचं समूळ उच्चाटन या देशातून व्हावयास हवे. पण ते कसे या विषयाची उकल करण्याचा प्रयत्न करताना कुणीही दिसत नाही. मूळात भ्रष्टाचार हा शब्द भ्रष्ट + आचार या दोन शब्दांची संधी आहे. थोडक्यात विचार करायचा, तर ज्यावेळी व्यक्तीचे आचरण भ्रष्ट होते त्यावेळी तो भ्रष्टाचाराचा जन्मदाता ठरत असतो.

आज जगात जेवढेही भ्रष्टाचार होत आहेत त्यांच्या मुळाशी प्रामुख्याने मानसिक भ्रष्टाचाराची भूमिका केंद्रस्थानी असते. कुठल्याही भ्रष्टाचाराची सुरुवात प्रथमतः मानवी मनातच होत असते, तदनंतर तो आर्थिक, सामाजिक तथा राजकीय नावाने वर्गीकृत केला जातो, पण त्याचे मूळ स्त्रोत आहे मानवी मन! पण आश्चर्याची गोष्ट ही की, या सर्व भ्रष्टाचारामध्ये धार्मिक भ्रष्टाचाराबाबत आम्ही कधी अवाक्षरही बोलत नाही. आम्ही आमच्या आध्यात्मिक जीवनात, भक्तीमार्गातही दररोज भ्रष्टाचार करतोय, पण त्याकडे आम्ही साफ दुर्लक्ष करतोय. ज्यावेळी मानवाचे आचरण भ्रष्टतेकडे जाते, त्यावेळी तो भ्रष्टाचाराच्या दिशेने आगेकुच करतो. आज आम्ही जे विचार-उपदेश संत महात्मा, पीर-पैगंबराच्या मुखारविंदातून ऐकतो तरी त्यानुसार आमचे कर्म करीत नाही, त्यावेळी आमच्या आचरणाला काय आम्ही श्रेष्ठ म्हणणार?

आम्ही बघतोय आज धर्माच्या नावाचा गैरवापर करुन भोळ्या भाबड्या मानवाला धर्मांधतेचं शिकार बनवलं जातंय, भक्तीच्या नावाने कर्मकांडांच्या अंधारकोठडीत त्यांना लोटलं जातंय. आध्यात्मिकतेच्या नावाने नवीन रुढी-परंपरा ज्या अधःपतनाकडे नेणाऱ्या आहेत. त्यांना खतपाणी घातलं जातंय. याला मग आम्ही काय म्हणावं, भ्रष्टाचार की श्रेष्ठाचार? नाव तर घेतलं जातंय श्रेष्ठाचाराचं, पण कुठंय श्रेष्ठ आचरण, श्रेष्ठ विचरण, सगळीकडे तर पसरलंय भ्रष्टाचाराचं कुरण! आज ज्या संत, पीर-पैगंबराच्या नावाची धोरवी आम्ही गातोय. त्यांच्या आदेश-उपदेशानुसार जर आपलं जीवन व्यवहारलं तर आम्ही या भ्रष्टतेच्या गर्तेत रुतलेलो नाही हे माना, अन्यथा आम्हीही त्याच उंबरठ्यावर उभे आहोत. संत्महात्म्यांनी याच आचरणानुसार गुरुमुख आणि मनमुखतेविषयी मानवमात्राला समया-समयाला जागरुकता प्रदान केली, तरी आज आमच्या कानात

मनमुखतेची मायावी धुन लगेच गुंजतेय, पण गुरुमुखतेच्या अनाहद नादापासून आम्ही आजही कोसो दूर आहोत. त्याचकारणाने आजमितीला सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज मानव समाजाला त्याच भ्रष्ट आचरणाच्या (मनमुख) कुरणातून श्रेष्टाचरणाच्या (गुरुमुखता) विशाल हिरवळीवर आणण्यासाठी प्रयत्नरत आहेत. मानवाचे मूळ रुप आचरण आहे. प्रेम, नम्रता, दया, सत्य, क्षमाशीलतेचं, पण मानवाने संसाररुपी मायेच्या मोहाने आचरणाला द्वेष, क्रोध, असत्य, मत्सराच्या वाटेवर नेऊन ठेवलंय. ही ठिणगीच पुढे भ्रष्टाचाराची ज्वाला बनून मानव तसेच मानवी समाज, मग तो कुठे राज्य, देश तथा जागतिक रुपाने आमच्या समोर येतो, गिळंकृत करीत जातो. जर आम्ही निरंकारी मिशनच्या तत्वज्ञानाकडे नजर टाकली तर आम्हास आढळते की, आज हेच एक असे दैवी मिशन आहे जे मानवाचे दैनंदिन आचरण, जडण-घडण श्रेष्ठत्वाचे बनवण्यासाठी प्रयत्नशील आहे.

एक भ्रष्ट कर्म भ्रष्टाचारी व्यक्तीची निर्मिती करते आणि त्याच व्यक्तीपासून भ्रष्टाचारी समाज, राज्य आणि देशाची ओळख ''भ्रष्टाचारी'' अशी होत असते. आम्ही निरपेक्षपणे विचार केल्यास असे जाणवते की, आम्ही श्रेष्ठ कर्म करण्याची प्रेरणा दुसऱ्यालाही दिली आणि स्वतःही त्याच कर्मांना आमच्या जीवनात व्यवहारलं तर सुदृढ, श्रेष्टाचरणी समाज आणि देशाची पायाभरणी आम्ही करु शकतो. जेथे आम्हाला सर्वदूर प्रेम, नम्रता, दया, शांततेची कर्म दिसतील आणि आज त्याच श्रेष्ठ कर्माची प्रेरणा घेऊन निरंकारी संत समाज सुंदर, सुदृढ आणि श्रेष्टाचरणी मानवी समाजाची निर्मिती करण्यात कार्यरत आहे. आज आम्ही भक्तीमार्गाचे पूजारी सुध्दा अनपेक्षितपणे भ्रष्टाचारामुळे चारीमुंड्या चित झालोय. नेहमी सत्संग, सेवा करतोय. तरी काहीतरी उणीव भासते, मन उदास होतं...का होतंय हे असं... कारण आमच्या आचरणात आज भ्रष्टता शिरलीय. कुठली भ्रष्टता, निंदा, वैर, द्वेष, अहंकार, मोठेपणा आणि कर्तेपणाच्या भुंग्यांनी पोखरायला घेतलाय आमचा भक्तीमार्ग. संतांच्या संगतीमध्ये तर मला प्रेम, नम्रतेची शिकवण दिली गेलीय, पण काय मी माझ्या सदगुरुंच्या आदेश उपदेशाला जीवनात व्यवहारलंय? युगपुरुष बाबा अवतारसिंहजी महाराज म्हणतात, **"किसी से वैर विरोध नही करना, निंदा नही करना, छल कपट नही करना, नम्रता और प्रेम का व्यवहार करना है। संतजनो, बच्चा भी आ जाये तो उनके चरणो में भी नमस्कार करना है।"** (अवतार उपदेश -भाग-२, पृष्ठ -१८८) आज आवश्यकता आहे सदगुरुंच्या शब्दांना व्यावहारिक रुप देण्याची, कारण सदगुरु बाबाजींच्या शब्दांना जीवनात व्यवहारलं तरच आमच्या जीवनात प्रेम, नम्रता, विशालता हे दैवी गुण येतील. ज्यांच्यामुळे आमच्या जीवनाचं कल्याण होईल. आमची आध्यात्मिक वृत्ती, भक्तीमार्ग जर परिपूर्ण बनावयाचा असेल तर आम्हाला आमच्या आध्यात्मिकतेला सुदृढ करावं लागेल आणि ती सुदृढता येईल समयाच्या सदगुरुंच्या शब्दाला कर्मरुप दिल्याने. सदगुरुच्या आदेशाला जीवनात व्यवहारल्याने!

गौरवपूर्ण जीवन जगण्यासाठी आम्हास या क्षणापासून श्रेष्टाचरणाची कास धरावी लागेल, कारण भ्रष्टाचाराच्या साथीने मानवी जीवनाचा कडेलोट झाल्याशिवाय राहणार नाही. आम्हा सर्वांना माहीत आहे की, कमकुवत पायावर उत्तुंग इमारत उभीच राहू शकत नाही, त्याचप्रमाणे भ्रष्टकर्माच्या अंधाऱ्या वाटेवर उज्ज्वल भवितव्याचा मानवी समाज आणि राष्ट्राची निर्मितीच घेऊ शकत नाही, म्हणून गुरुवचनांवर जीवनापन करुन या जीवनाला गौरवपूर्ण आणि सफल बनावयाचे आहे. कारण, "गुरुमुखतेचा" प्रवास हा श्रेष्ठत्वाच्या आणि श्रेष्टाचरणाच्या गौरवशाली परंपरेचा साक्ष आहे तर "मनमुखतेचा" प्रवास हा भ्रष्टाचारी, कलंकीत जीवनाचा अभिशाप आहे.

श्री. सुकदेव रुपचंद पाटील

कल्याण (पूर्व), ठाणे

वसुधैव - कुटुंबकम्

हे विश्वचि माझे घर। ऐसी मति जयाची स्थिर।
किंबहुना चराचर। आपण जाहला।।

संत ज्ञानेश्वर

साधुसंतांनी, ऋषीमुनींनी अतिशय उदात्त, उच्च, मंगल, अपूर्व अशी 'सारे विश्व, सारी पृथ्वी हेच एक कुटुंब' ही केलेली कल्पना मनाला अतिशय भावते. ध्येय तरी उच्च असावे त्यात मनाचा कमकुवतपणा कशाला ? एकीशिवाय कोणत्याच कार्याला परिपूर्णता येऊ शकत नाही. पण 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असल्यामुळे एकवाक्यता होणे ही दुर्मिळच. धर्मभेद, जातीभेद, वर्णभेद, वंशभेद, राष्ट्रभेद, स्त्री-पुरुष भेद, साक्षर-निरक्षर भेद, गरीब-श्रीमंत भेद अशा अनेकानेक श्रृंखलानी आपण इतके जखडलेले आहोत की, त्यातून मान वर निघतच नाही. वसुधैव कुटुंबकम् ही आज काळाची गरज बनलेली आहे. एकीशिवाय कोणत्याच कार्याला परिपूर्णता येऊ शकत नाही. पण 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असल्यामुळे एकवाक्यता होणे ही दुर्मिळच असा हा तिढा आहे. आज साऱ्या समाजाकडे आपण दृष्टिक्षेप टाकला तर जिकडे-तिकडे गडबड-गोंधळ आपल्याला आढळतो, याचे कारण तरी हेच. बाबा अवतारसिंहजी म्हणतात -

कोणाच्याही देहावरती वर्ण जातीचे चिन्ह नसे।
उच्च-नीच बनवूनी कोणा प्रभूने या धाडीले नसे।
प्रभुच्या दृष्टीमाजी जन हो निर्धन कोणी नसे धनवान।
राजा अथवा असो भिकारी प्रभूद्वारी तो एक समान।
लटकी सर्व जगाची प्रीती एक प्रभूची प्रीत खरी।
म्हणे अवतार शीश झुकविणे ही गुरुदरची रीत खरी।

अवतारवाणी पद क्र.३०३

समाजसुधारक, विचारवंत, संत महात्मे आपापल्या परिने ओरडून ओरडून सांगत आहेत की, सर्व सृष्टी ही एका कुटुंबासारखी माना. एकमेकांना समजून घ्या. पण 'पालथ्या घड्यावर पाणी' अशी समाजाची अवस्था आहे. वरवर पाहता परिस्थिती बदलल्यासारखी वाटते, पण रुजलेली पाळेमुळे खणून काढणे इतके सोपे नाही. 'असतोमा सदगमय तमसो मा ज्योतिर्गमय, मृत्योमाड मृतगमय', असत्याकडून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूनंतर अमृत्वाकडे जाण्याची प्रत्येकाचीच आकांक्षा असते. सद्विचार सतत रुजवत राहिले तर ते कधी ना कधी फळतीलच असे वाटते. आशेचा दिलासा हा मिळत राहतो की, प्रत्येक कठीण काळानंतर कोणीतरी असा महापुरुष जन्माला आला की त्याने त्या परिस्थितीवर मात केली आणि समाजाला उन्नती प्रत नेले.

यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मान सृजाम्यहम।।७।।

भगवदगीता

धर्माची जेव्हा ग्लानि होते व अधर्म माजतो. तेव्हा साधुजनांच्या रक्षणाकरीता व दुर्जनाच्या निर्दालनाकरीता मी अवतार घेतो असे भगवान श्रीकृष्णांनी म्हटले आहे. त्यानुसार घडतही आले आहे. शेवटी सश्रध्द माणूस गवताच्या पात्याप्रमाणे वादळ-वाऱ्यातही टिकून राहू शकला आहे.

एखादा सिनेमा जेव्हा आपण बघतो; त्यामागील नायकाची बाजू आपल्याला पटते. किंबहुना नायकाच्या जागी आपण स्वतःला बघत असतो व खलनायक होणे आपल्याला कधीच पसंत नसते. यावरुन माणसाची सद्विचाराकडे असलेली प्रवृत्ती दिसून येते. मुळात आपण सत्प्रवृत्त नसूही पण चांगले काय, वाईट काय याची जाण मनोमन आपल्याला असते. एखाद्या दृष्टालाही आपले कृत्य दुष्टपणाचे आहे हे माहीत असते. हे त्रिकालबाधित सत्य आहे. त्यामुळेच 'वसुधैव कुटुंबकम्' ही उदात्त कल्पना पूर्णतः कधीही फलित

झाली नाही. तरी तिच्या बाजूने सर्वच जण असणार यात शंकाच नाही. कोणीही असे म्हणणार नाही की, नाही नाही असे व्हावयास नको यातच या सार्वकालिक सत्याचा विजय आहे.

माझी एकदम नकारात्मक भूमिका समजू नका. 'मी अर्धा प्याला भरलेला आहे' असे म्हणणारा माणूस आहे. त्यामुळे संतांनी, ऋषी मुनींनी ज्याप्रमाणे न थकता आपले समाज सुधारणेचे व्यक्तिगत उन्नतीचे कार्य चालूच ठेवले. समाजसुधारकांनी डळमळीत न होता आपले विचार प्रसूत केलेच. शास्त्रज्ञानी सत्य लपवून ठेवले नाही. विचारवंतानी विचार प्रचाराचे कार्य अव्याहत चालविले तसेच माणसानेही कधी चुकत, कधी अडखळत, कधी ठेचाळत का होईना आपण एका कुटुंबातील आहोत ही भावना सतत मनात ठेवून वागायचा प्रयत्न केला तर तोही दिवस दूर नाही की जेव्हा सर्व जग समस्या रहित होईल, अशी आशा जरुर करु या. कुटुंबालाही प्रमुख असतोच. तो कोणाचीच बाजू घेत नाही व कोणत्या एका बाजूने झुकत नाही आणि आलेल्या सुख-दुःखाचा भार तो पेलतो व एकमेकांच्या प्रेमाने त्यातून सहिसलामत बाहेर पडतो. सर्वजण त्याला मान देतात व तोही सर्वांना सामावून घेतो. ही एवढी अवाढव्य पृथ्वी एक कुटुंब व तिचा प्रमुख कोण ? अर्थात कर्ता करविता परमेश्वर.

'एकोऽ हं बहुस्याम' एकाला अनेक रुपाने नटण्याची इच्छा झाली. त्यातून विश्व साकारले. आपण फक्त निमित्तमात्र आहोत. 'जग ही एक रंगभूमी आहे व आपण आपापला अभिनय त्यात करत असतो' असे शेक्सपिअरने म्हटले आहे.' देव दानवा नरे निर्मिले। हे मत लोका कवळू द्या' असे केशवसुत म्हणतात. एकूणच काय सत्य एकच आहे - 'वसुधैव कुटुंबकम्.'

श्री. रविंद्र दाभोळकर
चेंबूर -मुंबई

~~~~~~~~~

झोळी भरी

हे प्रभो, तुझ्या दारी
आम्हीच सारे भिकारी
देवोनी कृपा दान
आमची झोळी भरी।। धृ।।

तुझ्या भेटीची मला
लागली होती आशा
किती ओलांडीत आलो
तुझ्या पावलांच्या रेषा।।१।।

तू निराकार
तू साकार
मला कसा कळणार
तुझा तो आकार ।।२।।

भूक लागावी देवाची
तहान लागावी भावाची
आस असावी भक्तीची
तेणे लाभेल जीवा तृप्ती ।।३।।

देव या शब्दात
केवढी असते जादू
ज्याला ती कळाली
त्यालाच म्हणतात साधू ।।४।।

श्री. धर्मानंद आबाजी पटेकर
रपद (बु), अहमदनगर

~~~~~~~~~

श्री गुरुवचनामृत



गुरुवार, दिनांक १९ एप्रिल, २०१२ रोजी उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथे आयोजित सत्संग समारोहामध्ये उपस्थित विशाल मानव परिवारास संबोधित करताना सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी केलेल्या प्रवचनाचा मराठी अनुवाद.

संतजनहो, प्रेमाने बोला -
धन निरंकारजी !

संतजनहो, आज इथे उत्तर प्रदेशची राजधानी लखनौमध्ये येऊन या विशाल रुपात आपणां सर्वांच्या दर्शनाने फारच प्रसन्नता वाटत आहे. या शहरात येऊन अशा विशाल सत्संगाच्या रुपात दर्शन घेण्याची संधी बऱ्याच अवधीनंतर लाभली आहे. तसे पाहिले तर दोन वर्षांपूर्वी गोरखपूरमध्ये आयोजित

केलेल्या उत्तर प्रदेशच्या प्रादेशिक संत समागमाला जाताना इथे एक रात्र थांबण्याचा योग आला होता. मात्र या रुपात हा योग बऱ्याच वर्षानंतर आलेला आहे, जिथे एकत्र बसून सर्वजण आपली मनोवृत्ती या स्वामीशी, प्रभू-परमात्म्याशी जोडून ह्याचे गुणगान गात आहेत, श्रवण करीत आहेत. अशी वाणी जिला महत्व दिले तर, कर्मरुप दिले तर जीवनाचा उध्दार करु शकते. तेव्हा खरोखरच अशी प्रेरणादायक वाणी युगानुयुगे संत-महात्म्यांनी, गुरु-पीर-पैगंबरांनी जगाच्या हितासाठी, मानवाच्या कल्याणासाठी जगासमोर मांडली. जर मनुष्य याला जसेच्या तसे महत्व देत असेल तर तो आपले जीवन सार्थक करतो, आपले जगात येणे सफल करतो आणि आपला परलोकही सुगम करतो. याचाच अर्थ उभयलोकाची बाजी जिंकतो. परंतु ज्यांनी महापुरुषांच्या अशा वाणीला महत्व दिले नाही त्यांनी उभयलोक गमावले, ते इथेही (इहलोकी) धिक्कारले जातात आणि पुढेही त्यांचा आत्मा भटकंती करीत राहतो, जन्ममृत्यूच्या चक्रात अडकून पडतो.

महापुरुषांनी, संतांनी जो मार्ग अवलंबिण्याविषयी सांगितले आहे त्यातच प्रत्येक मानवाचे हित लपलेले आहे. म्हणूनच वारंवार संदेश दिले जातात, पुन्हा पुन्हा त्या संदेशाचा पुनरुच्चार केला जातो जेणेकरुन आपले हित कशात साठले आहे ही बाब मानवाच्या चांगली लक्षात यावी. सहसा मनुष्य हिताचा मार्ग सोडून देतो आणि ज्यामध्ये अहित आहे असा मार्ग अवलंबतो. प्रेरणा सत्याशी नाते जोडण्याची (दिली जाते) पण मनुष्य त्याकडे पाठ फिरवतो. ज्याला उठता-बसता ह्रदयात धारण करायचे आहे त्याला अगदी विसरुन जातो. त्याच्या ह्रदयात जर काही वसत असेल तर ते खोटे, म्हणजेच हा मिथ्या संसार वास करतो. महापुरुष विनम्र बनायला सांगत असतील तर हा विनम्रतेचा त्याग करुन अभिमानाने मस्त बनतो. जर महापुरुषांनी सांगितले की, प्रेम करावे तर हा प्रेमाचा त्याग करुन द्वेषाने युक्त होतो. तिरस्कार आणि असूयेचा भाव याच्या ह्रदयात ठासून भरला जातो. जर महापुरुष विशाल बनायला सांगत असतील, विशालतेचे प्रमाण द्यायला सांगत असतील तर ह्याचे ह्रदय अधिकाधिक संकुचित बनते. याचाच अर्थ जे काही आत्म्याच्या कल्याणासाठी सांगितले गेले किंवा जीवन उज्ज्वल बनविण्यासाठी सांगितले किंवा हे जीवन महत्वपूर्ण बनविण्यासाठी सांगितले त्याच्या उलटच मनुष्य वागू लागतो. ज्याप्रमाणे कित्येकदा दासने याची पुनरुक्ति केली की, बालपणाच्या अवस्थेत शाळेमध्ये शिष्टाचाराच्या काही गोष्टी शिकविल्या जातात आणि सांगितले जाते की या या गोष्टी नेहमी करा आणि या या गोष्टी करु नका. मुलांना शिष्टाचार समजावा, कशाप्रकारे चांगले वागावे, स्वच्छताही बाळगावी आणि ज्याने आपले हसे होईल अशा सवयी देखील जडू द्यायच्या नाहीत. तेव्हा अशाप्रकारे 'नेहमी करा' आणि 'करु नका'. मात्र घडते नेमके याच्या उलट. जे नेहमी करावे म्हणून सांगितले जाते ते करत नाहीत आणि जे करु नका म्हटले जाते त्याकडेच मनोवृत्ती वळते. जसे-

बुरे काम कउ ऊठि खलोइआ।
नाम की बेला पै पै सोइआ।

दुष्कर्मे करण्याकडे नेहमी उत्साहित आहेत, मात्र सत्याच्या बाबतीत आळशी बनतात, डोळेझाक करतात किंवा मग सत्संगला जाण्यासाठी वेळ नसल्याची लाखो कारणे त्यांच्याकडे असतात. आख्खा दिवस निंदा-नालस्ती करण्यात गेला तरी हरकत नाही पण सत्संगाच्या चार घटकांसाठी त्यांच्याकडे लाखो निमित्ते (बहाने) आहेत, लाखो कारणे आहेत. तेव्हा ज्या दिशेला जाण्यास सांगितले तिकडे जर मानव खरोखरच वळला असता तर आतापर्यंत धरतीचे केव्हाच स्वर्गात रुपांतर झाले असते. परंतु २१व्या शतकात पोहोचलो तरी ही धरती नरक बनून राहिली आहे असेच म्हणावे लागत आहे. केवढा रक्तपात, किती जुलुम-जबरदस्ती, धर्माच्या नावाखाली केवढी हिंसा, जाती-पातीच्या नावाने तिरस्कार करणे, अन्याय-अत्याचार करणे, मुठभर पैशासाठी चार इंच जमीन सुध्दा भाऊ भावाला द्यायला तयार नाही. उलट हमरी-तुमरीवर येतात. तेव्हा आजही जिभेवर हेच शब्द येत आहेत की, धरती नरक बनलेली आहे. रस्त्यावरची अवस्था काय आहे बघा. एका गाडीवाल्याने दुसऱ्या गाडीवाल्याला रस्ता देण्यासाठी एक मिनिट जरी उशीर केला तरी गाडीतून

उतरुन त्याला पिस्तुलाची गोळी घातली जाईल. म्हणायला म्हटले जाते की Road Race (रस्त्यावरची चढाओढ), असा शब्दप्रयोग केला जातो आणि रस्त्यावरुन जाताना एवढा उताविळपणा की, एक मिनिट रस्ता (साईट) दिला नाही म्हणून त्याला ठार मारले. त्या बिचाऱ्याच्या कुटुंबावर केवढी आपत्ती कोसळेल याचा काही विचार, याची काही जाणीवच नाही मनात. अशाप्रकारे मनुष्य इतका खालच्या पातळीवर जाऊ शकतो की, मुलगा पित्याचा जीव घ्यायला तयार आहे. का ? तर सर्व संपत्ती स्वतःलाच मिळावी, चुकून भावाला संपत्तीत वाटेकरु बनवू नये. तेव्हा आपण पदोपदी हेच पाहत आहोत आणि यासाठीच शायराने म्हटले आहे की,

हैरां हूं कि इस जमीं पर चलना न आया हमें।
हालांकि नक्श-ए-कदम हमारे चांद पर भी हैं।

एका बाजुला विकासाची केवढी तरी उंची आणि दुसऱ्या बाजुला मागासलेपण. माणूसकीच्या दृष्टीकोनातून पहा. हाच मनुष्य आहे जो कुठल्या कुठे चरमसीमेवर (extremes) पोहचला आहे, कितीतरी शोध लागले आहेत, अगदी थक्क करुन टाकणारे कितीतरी अविष्कार केले गेले आहेत. आता मोबाईल फोन किती लोकप्रिय झाले आहेत. (दूरवर) बोलण्यासाठी एका यंत्रापासून (टेलिफोन) सुरुवात झाली होती. त्यामध्ये आपण तारेला बांधिल होतो. त्यानंतर कॉर्डलेस फोन आले आणि तारेपासून सुटका झाली, खोलीमध्ये फिरत फिरत वार्तालाप करता येत होता. मग विचार केला की, खोलीतच का? गल्लीमध्ये आणखी अंतरावर जाऊन बोलता यावे, अशी संचार व्यवस्था बनविली जावी. मग त्याच्या फार पुढे गेले आणि आज तर मोबाईल फोनमध्ये न जाणो कितीतरी कार्ये (Functions) जोडली जात आहेत. इंटरनेट बघू शकता, कॅमेरा म्हणून वापरु शकता. अशाच प्रकारे कितीतरी Applications (उपयुक्तता) बनलेली आहे. आपण आपला रक्तदाब तपासू शकतो, मधूमेही रोग्याला त्यासाठी वेगळ्या मशीनची गरज नाही. समुद्रसपाटीपासून किती उंचीवर आहोत हेही सांगेल, तर रस्ता-गल्ली, पत्ता शोधायचा असेल तर ते नकाशेही त्यामध्ये आहेत, तीन मीटरपर्यंतची अचूक माहिती देणारे. तेव्हा नव्वदच्या दशकामध्ये आपण कधी याचा विचार तरी केला होता का? आता आणखी कुठपर्यंत जाईल हे येणारा काळच ठरविल. तेव्हा एका बाजुला मनुष्य कुठल्या कुठे पोहचला आहे पण (दुसऱ्या बाजुला) मागासलेपणा तितकाच पराकोटीचा आहे, जणू एक सुई (मीटरवरील) उजव्या बाजुला जाऊन थडकते आणि तेवढ्याच वेगाने परत फिरुन डाव्या बाजुला येऊन आपटते. मानवाची इतकी प्रगती प्रचंड आहे.

❖ उजेडाने भरपूर होऊन या आत्मा, या मनाला प्रज्वलित करुन जीवन प्रवास व्यतीत करायचा आहे. यानेच धरतीचं रुप निर्मळ होईल, ही धरती स्वर्ग बनेल. यातच सर्व मानव जातीचे कल्याण आहे.

❖ जर मूल रडत असेल तर कोण म्हणेल की हिंदीत रडत आहे किंवा जपानीत. स्वतः आधार बनवता आणि मग निघता अभिमान आणि घृणा करण्यासाठी. मालकानं कुठे चिन्ह बनवली आहेत कोण हिंदू आहे, कोण मुस्लिम आहे, कोण ब्राह्मण आहे, कोण शूद्र आहे ?

कोणी प्राणी चंद्रावर पोहचू शकतील का? हे पशू कुठे अंतराळयानाचा विचार करु शकतील? मोबाईल फोन बनविणे तर दूरच राहो पण तो वापरण्याचाही (पशू) विचार करु शकत नाहीत. त्यादृष्टीने मनुष्य निश्चितच पशुपेक्षा श्रेष्ठ आहे. मात्र त्याचे मागासलेपण पाहिले तर पशूपेक्षाही हीन. माणसाच्या चरित्रात, त्याच्या व्यक्तित्वात, त्याच्या वर्तनात केवढी पराकोटीची हीनता आहे. तेव्हा महापुरुष-संतजन हेच समजावण्याचा प्रयत्न करीत आले आहेत की, हे मानवा! मुळात तू मानवासारखे आचरण तरी कर, मग तुझी प्रगती, तुझा विकास सर्वकाही लखलाभ आहे. जसा तो शेर आहे की,

कुछ भी बनो मुबारक है पर पहले इन्सान बनो।

हवे तर तू डॉक्टर बन, इंजिनियर बन, वकील बन, वैज्ञानिक बन, खेळाडू बन, अनेक खेळ आहेत त्यामध्ये प्राविण्य मिळव आणि स्थानिक नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर जा, आंतरराष्ट्रीय चमूमध्ये भाव घे, सर्वकाही लखलाभ आहे. आणखीही प्रभूने कलागुण दिला असेल तर कलाकार हो, एखादा अभिनेता बन, चित्रकला किंवा संगीताच्या क्षेत्रात प्राविण्य मिळव. जर तुझे पाय थिरकत असतील, उत्तमप्रकारे अंगाच्या हालचाली करता येत असतील तर उत्तम नर्तक बन, तीही एक कला आहे, सांसारिक दृष्टीने त्यामध्येही यश मिळत असेल तरीही काही हरकत नाही. मात्र आपण मानवतेचा त्याग करुन एखादा कलाकार किंवा खेळाडू बनलो नाही ना? ही गोष्ट ध्यानात ठेवावी लागेल. मानवतेला तिलांजली देऊन आपण डॉक्टर बनलेलो नाही ना? एखाद्या धडधाकट माणसाला बेशुध्द करुन त्याची किडनी काढून घेत असेल आणि कोणाला कळूही देत नसेल. जर खेळाडू असेल तर मॅच फिक्सिंग करुन देशालाच डावावर लावत असेल. चांगला खेळाडू आहे, शतकही ठोकतो; पण देशाशी गद्दारी. मानवतेचा कुठे मागमूसही नाही. प्रत्येक क्षेत्रात आपल्याला हे पहायला मिळत आहे. सत्ता हातात मिळाली की तिथेही सर्वतोमुखी एकच गोष्ट आहे की, सत्ता मिळाली, एखादी पदवी मिळाली की बस्स! मग गरीबांचे रक्तशोषण करायचे, जेवढे जमेल तेवढे शोषण करायचे. देशाचा केवढा तरी विकास होऊ शकतो, कितीतरी प्रगती होऊ शकते. काही वर्षांपूर्वी तर एक कोटी, दोन कोटी ही आकडेवारी फार मोठी वाटत होती. परंतु आज हजारो कोटींपेक्षा कमीची वार्ताच नाही. इतके कोटी खाल्ले, पचवले इत्यादी. मग कुठे राहिली माणूसकी? राज्यकारभार चालवायला मिळत असेल तर राजा जनकाला मिळाला नव्हता का? राज्यकारभार चालवायला काही आक्षेप नाही. शेवटी देश चालवायचा असतो, सोपे काम नाही, फार अवघड काम आहे. तेव्हा प्रभू अशी संधी देत असेल तर लखलाभ असो. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, जागा (पद) मिळाली आहे, स्थान

मिळाले आहे तर शोषण करावे, लोकांच्या असहायतेचा पुरता फादा उठवायचा. तेव्हा आणखी तू काहीही बन पण आधी माणूस बन. जीवनात मानवता भक्कम बनणे आवश्यक आहे. जर माणुसकीच नसेल तर तो माणूस कसला ? माणुसकी नसेल तर माणूस आणि माणुसकी हे शब्द तरी कशासाठी ? माणुसकी असेल तर माणूस आहे, माणुसकीच नसेल तर मग माणूस कुठे राहिला ? म्हणूनच मग त्याला पशू म्हणावे लागते.

करतूति पसू की मानस जाति।
लोक पचारा करै दिनु राति।

ह्याची करतूत पशूहून हीन आहे आणि म्हणवला जातोय मनुष्य किंवा मानव. परंतु खरे पाहता तो माणूस म्हणवून घेण्याच्याही योग्यतेचा नाही. मानवाने ही बाब समजून घ्यावी, त्यानेच त्याचा उध्दार होईल आणि तो यशाचा भागीदार बनू शकेल. स्वतःही आनंदी बनू शकेल आणि इतरांच्या आनंदालाही कारणीभूत ठरु शकेल. परंतु जसे (आधी) म्हटले की, तो त्या दिशेला वळत नाही, त्याच्या अगदी उलट दिशेला वळतो आणि दुसरी बाजू जी परमार्थाची आहे, तिचा परित्याग केला जातो. तेव्हा समोरुन हे ऐकायला मिळते की, मी परमार्थ तर करीतच आहे. मी सकाळी-सकाळी उठून माळ जपतो, तीर्थस्थानी जातो, स्नान करतो, चंदनाचा टिळाही लावतो. आणखीही सर्व साधनांचा अंगिकार करतो, केसांचे मुंडन करतो, केस वाढवतोही, विशिष्ट रंगाची वस्त्रेही परिधान करतो, शरीराला सुकवतो (कायाक्लेश), दोन-दोन दिवस उपाशी राहू शकतो इत्यादी. यालाही तो आपण परमार्थी असल्याचे मानव असतो. परंतु महापुरुष-संतजनांनी धर्मग्रंथांमध्ये दिलेले निर्णय असेच मिळाले की, जरी तू हे सर्वकाही करीत असशील; पण दुसरी जी व्यावहारिक बाजू आहे तिथे क्रूरता, अभिमान, संकुचितपणा, विलासी असशील तर मग कोणता परमार्थ साधत आहेस ? केवळ ते कर्मकांड, त्या क्रिया पार पाडणे म्हणजेच परमार्थ ठरतो का ? भक्तीचे तेच का खरे रुप आहे ? पाच वेळा नमाज पढले आणि नंतर वाट्टेल ते करीत राहिले किंवा सकाळी-सकाळी स्नान केले, तीर्थाला गेले यालाच भक्ती-आराधना म्हटले जाते का ? तेव्हा सांगण्याचे तात्पर्य हेच की, महापुरुषांनी-संतजनांनी या ज्या काही कसोट्या आपल्या सर्वांच्या समोर आहेत त्याकडे वारंवार लक्ष वेधले आहे. त्यांच्यावर खरे उपरायचे आहे. माणसासारखे वागून माणूस असल्याचे सिध्द करायचे आहे. तशा विचारांनी, तशा भावनांनी युक्त होऊन विचरण करायचे आहे. अशा दिव्य गुणांनी युक्त होऊन जीवनप्रवास करायचा आहे. प्रेम, करुणा, दया, नम्रता (अंगी) असावी, अहंभाव नसावा. जसे महापुरुषांनी वारंवार आपल्या वचनांतून व कर्मांद्वारे याकडेच लक्ष

❖ लोक वाईटाकडे नेहमीच उत्साहित असतात परंतु सत्याकडे आळस करणारे, डोळे फिरविणारे आहेत. निंदा-नालस्ती मध्ये वाटल्यास संपूर्ण दिवस निघून जावो, परंतु सत्संगाच्या चार घटकांसाठी माणसाजवळ लाखो बहाणे आहेत.

❖ एका बाजूला विकासाची उंची आहे तर दुसऱ्या बाजूला मागासलेपणाची इतकी पराकाष्ठा आहे की, माणसाचं चारित्र्य हीन दर्जाचं बनलं आहे. महापुरुष समजावतात की, तू मानवी चाल चालून दाखव मग तुझे पुढे सरकणे, विकास करणे सर्व धन्यवादास पात्र आहे.

वेधले की,

मत कर रे अभिमान तू बंदे, मत कर रे अभिमान।

तसेच

आपस कउ जो जाणै नीचा।
सोऊ गनीऐ सभ ते ऊंचा।

अर्थात् स्वतःला जो पामर मानतो तोच श्रेष्ठांच्या गणतीमध्ये येतो. जे आखडून चालतात, तनाचा, धनाचा, विद्वत्तेचा अभिमान करतात, सत्तेचा गर्व बाळगतात, आपल्या शारीरिक ताकदीचा, सौंदर्याचा अभिमान करतात ते श्रेष्ठांच्या गणतीत येत नाहीत. तर जे स्वतःला पामर समजतात तेच श्रेष्ठांच्या गणतीमध्ये येतात. जर त्या रुपात पहायचे झाले तर रावणाचा फार महिमा आहे कारण तोही अभिमान करीत होता, राजा होता. आमच्याजवळ कितीसे सोने असेल? त्याची तर लंकाच सोन्याची होती. अशाच प्रकारे कितीतरी शक्ती बाळगणारे हिरण्यकश्यपुसारखे - मी दिवसा मरु नये, रात्री मरु नये, जमिनीवर मरु नये, आकाशात मरु नये अशा कितीतरी अटी लावल्या होत्या. आपल्याला कोणी हात लावू शकणार नाही इतका विश्वास त्याला या गोष्टींवर होता. पण त्या अभिमान करणाऱ्याची काय गत झाली ते इतिहासाची पाने सांगत आहेत. अशाच प्रकारे जातीच्या आधारावर दुसऱ्याला नीच व स्वतःला उच्च मानणाराही श्रेष्ठ ठरत नाही. महापुरुष म्हणत आहेत की,

उँचा कुल का जन्मया करनी उँच ना होये,

व

जाति पाति पूछे नहीं कोय, हरि को भजे सो हरि का होय।

तसेच

जातिका गरबु न करि मूरख गवारा।
इसु गरब ते चलहि बहुतु विकारा।

तेव्हा असा जातीचा अभिमानही करीत आहात आणि दुसरीकडे असेही म्हटले जात आहे की,

पांच तत्व का पुतला नानक मेरो नांव।

आणि

कबीरा धूरि सकेलि कै पुरिआ बांधी देह।
दिवस चारि को पेखना, अंति खेह की खेह।

तीच माती, तीच पाच तत्वे प्रत्येकाच्या शरीराशी जोडलेली आहेत. तेव्हा कोणत्या वस्तुवर अभिमान करीत आहात? आधारहीन. कोणताही आधार नाही. स्वतःच आधार बनवता आणि मग बाहेर पडता

द्वेष करण्यासाठी. प्रभूने कुठे बनविली आहेत विशिष्ट चिन्हे की कोण हिंदू आहे, कोण मुसलमान आहे, कोण शिख आहे, कोण ख्रिश्चन आहे; कोण ब्राह्मण, कोण शुद्र, कोण वैश्य आणि कोण हरिजन आहे ? कोणतीच निशाणी नाही. जर एखादे मूल रडत असेल तर कोण म्हणू शकेल की ते इंग्रजीत रडत आहे. पंजाबीमध्ये रडत आहे, हिंदीमध्ये रडत आहे किंवा जपानीमध्ये रडत आहे. ते केवळ रडत आहे. तेव्हा असे हे भेदभाव, ज्यामुळे मनुष्य स्वत:ला इतरांपासून वेगळा मानतो. (मी) श्रेष्ठ आहे, विशेष आहे; मी-मी करीत असतो आणि दुसऱ्यांना कनिष्ठ दाखवण्याच्या मागे लागलेला असतो. तेव्हा मानवाची अशी प्रवृत्ती बनलेली आहे. त्यापासून तो परावृत्त होत नाही. (अशा गोष्टी) तो करतही असतो आणि असे करत असल्याचे मान्यही करीत नसतो. मी कुठे करत आहे असे म्हणत असतो. जसे ते उदाहरण बऱ्याच वेळा दिले की, एक पती आपल्या पत्नीला म्हणाला, "तू मला कुत्रा म्हणालीस ?" पत्नी म्हणाली, "नाही." पतीने पुन्हा विचारले, "तू मला कुत्रा म्हणालीस ?" पत्नी म्हणाली, नाही. मी असे म्हटले नाही. (तरीही) पतीने पुन्हा विचारले, "तू मला कुत्रा म्हणालीस ?" तेव्हा पत्नी म्हणाली, "आता भूंकणे थांबवाल की नाही ?" तेव्हा भुंकते कोण, कुत्रेच भुंकतात. अशाप्रकारे कबूलही करीत नाही. मी नाही म्हटले, असे म्हणत आहे आणि भूंकतोस म्हणून हेही सिध्द करीत आहे की, तू खरोखरच कुत्रा आहेस. तर मानवाची अशी प्रवृत्ती नेहमीच पहायला मिळत आली आहे.

जोपर्यंत हे श्वास चालू आहेत तोपर्यंत सर्वांना ही जागृती प्राप्त होणे आवश्यक आहे. प्रकाशाने आलोकित होऊन या आत्म्याला, या मनाला प्रकाशमान बनवून जीवनप्रवास करणे जरुरी आहे. याद्वारेच या धरतीचे रुप उजळून निघेल, ही धरती स्वर्ग बनेल, यातच समस्त मानवजातीचे कल्याण आहे. प्रत्येक युगात, प्रत्येक कालखंडात गुरु-पीर-पैगंबरांनी हा कल्याणकारी मार्ग जगाला सांगितला आहे. (तेव्हा) जिथून बोलायला सुरुवात केली की, (हे मानवा) त्या मार्गावर तू चालत नाहीस. खरंच! त्या मार्गावर चालला असतास तर तुझा दर्जा कुठल्या कुठे पोहोचला असता आणि या धरतीचे रुपही उजळणार होते. सर्वत्र सुख-शांती नांदत राहिली असती. प्रभूने तर या धरतीचे रुप सुंदर बनविले आहे, पण मानवानेच तिची दुर्दशा केलेली आहे. अंतराळात गेलेल्या अंतराळवीराला (astronautes) विचारले तेव्हा त्याने सांगितले की, Our planet is so beautiful from here (आपला ग्रह इथून फारच सुंदर दिसत आहे). इथून आम्ही पाहत आहोत की, धरती कितीतरी सुंदर आहे आणि पुढे बोलत आहे की, We cannot see any boundaries of Nations (आम्हाला देशांच्या सरहद्दी दिसत नाहीत.) आम्हाला कोणत्याही हद्दी-सरहद्दी दिसत नाहीत. Homogeneous (एकसंध) अशा या धरतीवर एकसारखा निळा, हिरवा, करडा रंग दिसत आहे. तेव्हा ते सांगत आहेत की, आम्हाला इथे कोणत्याही रेषा दिसत नाहीत and earth is so peaceful (आणि धरती अगदी शांत असल्याचे जाणवत आहे इथे).

सांगण्याचे तात्पर्य, ते म्हणत आहेत की, शरीराने आम्ही फार दूर आहोत. (We are thousands of miles away from the earth) परंतु इकडे येण्यापूर्वी जेव्हा आम्ही धरतीवर होतो किंवा इथून जेव्हा परत धरतीवर जाऊ, लँडींग करु, तेव्हा पुन्हा तेच देश, त्याच हद्दी-सरहद्दी, तेच तू-तू, मी-मी, तोच रक्तपात, तेच विभाजन, सर्वकाही तेच. तेव्हा अंतराळयात्री देखील म्हणत आहेत की, खरंच! आम्ही परत गेल्यावरही तिथे विचरण करताना धरती अशीच शांत राहिली असती तर? ही त्यांची शुभकामना होती, प्रार्थना होती परमात्म्याकडे. सांगण्याचा भावार्थ, इतके लोक वास्तव्य करीत आहेत म्हणजे आवाज (गोंगाट) तर होणारच. त्यादृष्टीने नीरव शांतता म्हणता येणार नाही. सांगण्याचे तात्पर्य, मनुष्य जे विपरीत आचरण करीत आहे आणि त्या स्वरुपात जो गोंगाट आहे, त्यातून आपली सुटका व्हावी. हा जो हाहाकार माजला आहे त्यातून मुक्ती मिळावी. जशी इंग्रजीत एक म्हण आहे की, We need a living peace and not the peace of a grave. (आम्हाला

जिवंत शांती हवी स्मशान शांतता नको). एखादा कबरीमध्ये दाखल झाला असेल आणि आपण म्हणू की, Peaceful (शांत) वातावरण आहे कब्रस्थानातील! तिथे कबरीत जाऊन पडला आहे तेव्हा कसला शांत झाला (म्हणावे). जी शांती हवी आहे ती अशी की, चालत-फिरतही आहेत, एकमेकांशी व्यवहारही करीत आहेत आणि तरीही शांती आहे. तेव्हा आपल्याला जिवंत शांती हवी, कब्रस्थानातील शांती नको. जे संत प्रवृत्तीचे असतात त्यांची हीच इच्छा असते आणि अशा इच्छापुर्तीसाठी ते उपकार करतात. झोपलेल्या मानवाला जागे करतात आणि त्याला जाणीव करुन देतात की, तुला फार श्रेष्ठ योनी मिळालेली आहे, तुला सर्वोत्तम जन्म मिळालेला आहे त्याला कवडीमोलाने गमावू नको, या मानवजातीला शरमेने मान खाली घालायला लावू नकोस, गुरु-पीर-पैगंबरांना बदनाम करु नकोस. अन्याय-अत्याचार तू करावेस आणि बदनामी अल्ला आणि रामाची व्हावी, असे तू मुळीच करु नकोस. असे श्रेष्ठत्व मिळव की, अवघ्या मानवजातीला तुझ्याबद्दल अभिमान वाटू दे.

अशा तऱ्हेने सर्वत्र मनुष्य शांतीसुखात नांदत राहावा, हीच एक शुभकामना, हीच प्रार्थना केली जाते. तेव्हा दास आणखी शब्दांचा आधार घेणार नाही, वेळ फारच पुढे गेली आहे. शेवटी, इथे येऊन या विशाल रुपात आपणा सर्वांच्या दर्शनाने प्राप्त होणारा आनंद पुनश्च व्यक्त करतो. थोड्या दिवसांपूर्वीच आपणांस सूचना दिली गेली आणि अलिकडचे काही कार्यक्रम अगदी तीन दिवस अगोदर सूचना देऊनच आखले गेले. मग हरियाणामधील करनालचा असो, चंदिगडमध्ये असो, चंदिगडमध्ये ९ तारखेला आणि मथुरा येथे ५ तारखेला आयोजित कार्यक्रम असो. तिथेही तीन दिवस अगोदरच सूचना देता आली. परंतु सर्व ठिकाणी असेच विशाल रुप बनले आणि हाच प्रघात या दौऱ्यात, या कालावधीत पडला. फरुखाबाद, कानपुर आणि मग आज इथे लखनौमध्येही अल्पावधीच्या पूर्वसूचनेनंतरही महापुरुषांनी सुंदर आयोजन केले. आणखीही अनेक रुपांत जे सहकार्य यांना मिळाले आणि तमाम संत संगतीचा उत्साह; ती दिवस अगोदर यांना सांगितले गेले, पण भक्तांची आवड इतकी प्रचंड असते की, जणू समागमासाठी त्यांनी काज्या-बोज्या (बोरिया-बिस्तरा) आधीच बांधून ठेवलेला असतो. सूचना मिळण्याचा अवकाश! लगेच तिकडे पावलं पडू लागतात. ही आवड आहे, गोडी आहे. ती ओळ जी दासने सुरुवातीला म्हटली जगासाठी की,

बुरे काम कउ उठि खलोइआ।
नाम की बेला पै पै सोइआ।

इथे भक्तांसाठी मात्र वेगळी बाब लागू होते. हे तर भल्यासठी व परोपकारासाठी सदैव उत्साहित असतात. अशा तऱ्हेने हे सत्याच्या प्रति जागृत आहेत आणि खोट्याला निम्न दर्जा देतात म्हणजेच जीवनात त्याला महत्व देत नाहीत. तेव्हा अशाप्रकारे दातारने सर्वांचे विचार व भावना कायम राखावी, जेणेकरुन सकळजन भक्तिमय जीवन जगत जावोत आणि त्याबरोबरच सर्व प्रकारची भौतिक सुखेही प्राप्त करोत.

संतजनहो, धन निरंकार.

प्रस्तुती - **सविता चौधरी**
मराठी रुपांतर - **स. वि. लव्हटे**

प्रेमाची भाषा सर्वोत्तम भाषा

युगायुगापासून आम्ही प्रेम या शब्दाविषयी ऐकत आलो आहोत. प्रेम हे एक अशा अवस्थेचं नाव आहे, जिथे पोहचल्यानंतर स्वतःला पूर्णतः समर्पित झाल्याचे वाटते. प्रेम शब्दाचा प्रयोग आम्हाला क्षणोक्षणी कुठेना कुठे कोणत्या तरी स्वरुपात पाहायला मिळतो. परंतु आज मोजकेच लोक प्रेम करणारे अर्थात प्रेमी मानले जातात. प्रभूप्रेमी अर्थात ब्रह्मज्ञानी (ईश्वरभक्त) करीता सदासर्वकाळ सुलभ आहे. जेथे प्रेम आहे तेथे ईश्वर साक्षात विद्यमान आहे. अर्थात Love is God, God is Love म्हणजेच प्रेम ईश्वर आहे आणि ईश्वरच प्रेम आहे. आमच्यामधील अज्ञान प्रेमभाव समजू देत नाही. संत कबीरजी आपल्या शब्दांत स्पष्ट करतात की,

"जा घर प्रेम न संचरै सो घट जान मसान।"

ज्या मानवीय घटामध्ये प्रेमाचा वास होत नसेल तो घट (शरीर) स्मशानातील शवाप्रमाणे आहे. संत रहीमजी आपल्या वाणीतून स्पष्टीकरण देतात की,

"रहिमन धागा प्यार का, मत जोडो चटकाय।
जोडे से फिर न जुडे, जुडे तो गाठ परि जाय।।"

दोन व्यक्ती मध्ये जे नातं असतं ते प्रेमरुपी धाग्यात गुंफलेलं असतं म्हणून ह्या नात्याला तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपावं लागतं. या नात्याला जर का अविश्वासाचा तडा गेला तर तो प्रेमरुपी धागा सहज तुटतो आणि जुडत नाही, जुडलाच तर त्याला गाठ पडते आणि वेळेनुसार त्या गाठीचा स्पर्श सुध्दा जाणवतो. त्यावेळेस वेळ निघून गेलेली असते. मग काहीच उपयोग होत नाही. म्हणूनच म्हणतात-

समय चुके पुनि क्या पछताने
क्या वर्षा जब कृषि सुखाने।

जेव्हा शेताला पाणी देण्याची गरज होती तेव्हा ते दिलं नाही. मग पीक सुकून गेल्यावर पाणी देऊन उपयोग काय? विचार करायचं झालं तर प्रेमाचे तीन भाग पडतात. १) तामस प्रेम, २) राजस प्रेम, ३) सात्विक प्रेम.

१) तामस प्रेमः- या वृत्तीच्या मानवामध्ये राजस तथा सात्विक प्रेमाचा अभाव दिसून येतो. या वृत्ती या मानवामध्ये सुंदर मनमोहक वस्तुच्या मोहात तो तत्काळ आकर्षित होतो आणि त्यामध्ये फसतो. तसेच त्या वस्तू कुठल्याही प्रकारे आणि शीघ्रतेने प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. जर त्या वस्तू त्याला प्राप्त करण्याकरीता आपल्या मानसन्मानाचा तथा शीलाचा सुध्दा त्याग करावा लागला तरी तो मागे पुढे बघत नाही. हे तामसी प्रेम आहे. आज समाजामध्ये चोरी करणे, दरोडा टाकणे, लुटमार करणे ,फसवेगिरी करणे, व्याभिचार तथा खून करणे ही तामसी प्रेमाची कारणे आहेत.

२) राजसी प्रेम :- या वृत्तीमुळे हा मानव एखाद्या सुंदर वस्तुकडे तथा व्यक्तीकडे आकर्षित (मोहित) झाला, तर तो त्या प्राप्त करण्याची कामना करतो. परंतु त्या प्राप्त करण्याच्या प्रयत्नासोबत समजदारी तथा विवेक सोडत नाही. तो आपल्या बुध्दीचा योग्य वापर करुन हे प्रेम (राजसी) म्हणजे शारीरिक प्रेम प्राप्त करतो व हे प्रेम प्राप्त करण्यापर्यंतच मर्यादित राहते. या प्रेमामध्ये हिर-रांझा, लैला-मजनू आणि शीरी-फरहाद इत्यादी येतात. या प्रवृत्तीमुळे प्रभावित मानव जास्तीत जास्त अध्यात्माकडे (ईश्वराकडे) वळला जातो. चिंतामणी व विश्वमंगल, रत्नावली व तुलसीदास याच प्रेमामुळे अग्रेसर झाले होते.

३) सात्विक प्रेम :- सात्विक वृत्ती मानवाला मानवतेचं तथा प्राणिमात्राचं भलं करण्याची आणि परोपकाराची प्रेरणा देते. हे प्रेमी एक दुसऱ्याच्या प्रति त्याग आणि बलिदानाची भावना ठेवतात. स्वतः उपभोग घेण्याऐवजी त्यांचा भाव दुसऱ्याला देण्याचा असतो. हे प्रेम समाजकल्याणकारी समाजाला सुंदर दिशा तसेच प्रेरणा देण्यासाठी उपयुक्त ठरते. राधा -कृष्ण तथा सिता-राम इत्यादी या प्रेमाची उदाहरणे आहेत. हे प्रेम मानवाला अध्यात्माकडे (ईश्वराकडे) चालायला प्रेरित करते. मानव ईश्वराला प्राप्त करुन ईश्वर भक्तीच्या (प्रेमाभक्ती) रंगामध्ये रंगून आपलं सर्वस्व (तन,मन, धन) ईश्वराला

समर्पित करुन ईश्वररुप होण्याची कामना करतात.

या ठिकाणी हे स्पष्ट करावं लागेल की, प्रेम वस्तुतः हृदयाचा भाव आहे. आजपर्यंत प्रेम करणाऱ्यांची संख्या इतिहासात फार कमी म्हणजे मोजकीच उदाहरणे पाहायला मिळतात. कारण हा सर्व मोहमायेचा प्रभाव आहे. संत कबीरजी सुंदर स्पष्टीकरण देतात-

माया मरी न मन मरे, मर मर गये शरीर।
आषा तृष्णा न मरे, कह गये दास कबीर।।

माया काहीही करु शकते. ही या प्रेमाच्या घटनांना विराम देण्याकरीता सामाजिक मानसन्मान, तर कधी उच-नीच, गरीब-श्रीमंती, उद्योगधंदा नाहीतर मोहामध्ये फसविते. जर या सर्व यत्नांनी काम झालं नाहीतर प्रेमीला त्याचे रुपरंग, बाहेरचा देखावा, नातीगोती, जातपात तथा धर्माच्या न्यायनीती मध्ये भुलवून टाकते. ज्यामध्ये आम्ही स्वतःला प्रियतमाच्या जवळ तर पाहतो. परंतु खऱ्या प्रेमामध्ये अराफलता राहते. जोपर्यंत प्रियतम तू (अद्वैत) आणि मी (द्वैत) मध्ये स्वतःला फसवून ठेवतो तोपर्यंत समजायचे प्रेम निर्माणच झाले नाही, समर्पण आलेच नाही. या संबंधामध्ये एक गोष्ट आठवते.

एक प्रेमी ज्यावेळेस आपल्या प्रेयसीच्या घरी तिला भेटायला जातो आणि दरवाजा वाजवतो व तिला आवाज देतो. आतून प्रेयसीने विचारले कोण आहे? कोण पाहिजे? प्रियकर उत्तर देतो मी आहे तुझा प्रियतम; ओळखलं नाही मला? आतमध्ये शांतता निर्माण झाली; मौन झालं! काही एक उत्तर मिळालं नाही. प्रियकर जोरजोराने दरवाजा वाजवायला लागला, बोलला, "काय तू मला विसरलीस?" प्रेयसीने सांगितले, "माफ करा या घरामध्ये दोघांच्या राहण्याची जागा नाही दोघे येथे राहू शकत नाहीत." **"प्रेम गली अती साँकरी नामे इसमें दो ना समाये।"** आणि आपण सांगत आहात मी तुझा प्रियकर आहे. आता आपण कृपया परत जा आणि ज्यावेळेस परिपक्व होणार त्यावेळेस या. प्रियकर निघून गेला. जंगल-जंगल, गाव-गाव, दऱ्या खोऱ्या भटकत होता. भरपूर वर्षे निघून गेली. ऋतू आले आणि निघून गेले नंतर काही दिवसांनी प्रियकर परतला. प्रेयसीच्या घरी येऊन, दरवाजा वाजवून आवाज दिला. आतून आवाज आला कोण आहे? प्रियकराने सांगितले, आता काय सांगू फक्त तुच तू (अहंकार) (अद्वैतच अद्वैत) आहे. तुझ्याशिवाय कोणीच नाही. "मी" सुध्दा आज येथे उपस्थित नाही.

"जहाँ तु है वहाँ मै नही। जहाँ मै है वहाँ तु नही।।"

आणि दरवाजा लगेच उघडला. तद्वत मायेच्या बाह्यआवरणाने (सूक्ष्म मोहमाया) प्रियतमाचा पत्ता माहीत असूनही अद्वैत समोर असून द्वैतामध्ये पूर्णतः भुलवून ठेवले होते. म्हणूनच म्हटले आहे-

"एक म्यान में दो तलवारे, देखी सुनी ना कान।
पीना चाहे प्रेम रस रखना चाहे मान।।"

वास्तविकता तर ही आहे प्रेम शीतल, थंड हवेप्रमाणे आहे. जे की सर्व मानवमात्राला गरीब- श्रीमंत, काळा-गोरा, उच-नीच, जात-पात, धर्माच्या भेदभावा पलीकडे गारवा देण्याची ताकत, क्षमता ठेवते. तसेच ज्याप्रमाणे जंगलामधून, पर्वतामधून तथा सपाट मैदानामधून वाहणारी सरीता अखेर सागराला जाऊन मिळते. त्याचप्रमाणे प्रेम सर्वप्रकारच्या चढ-उतारामधून, अडी-अडचणीमधून आणि मोठ-मोठ्या संकटामधून (षडरुपी - काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह इत्यादी) प्रेयसीकडे घेऊन जाते आणि प्रेमी व्यक्ती ईश्वराकडे अग्रेसर होत राहतो.

आज आम्हालासुध्दा विचार करण्याची गरज आहे. आज तर प्रत्येक मानव हा ईश्वरावर प्रेम करतो. एक संत कवी सुध्दा आपल्या वाणीतून भाव स्पष्ट करतात-

"एक उम्र भी कम है मुहब्बत के लिए।
लोग वक्त कहाँ से निकालते है नफरत के लिए।"

शेवटी आम्हाला एकच भाव समजायचा आहे, तो म्हणजे आज समयाचे सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी खालील प्रमाणे स्पष्ट केला आहे, **"प्रेमाची भाषा सर्वोत्तम भाषा."**

श्री. शिवहरी महादेव वानरे
मु.पो. चिंचोली
ता.शेगांव, जि. बुलढाणा

~~~~~~~~~~
~~~~~~~~~~

माणुसकीनं वागूया !

एका धर्मगुरुने आपल्या शिष्यांना विचारले, 'स्वर्गात कुणाकुणाला जायला आवडेल?' सर्व शिष्यांनी हात वर केले. त्यातीलच एका शिष्याने हात वर केला नव्हता. धर्मगुरुंनी त्यास कारण विचारले असता तो शिष्य म्हणाला, 'जर सर्वच स्वर्गात गेले तर इथेच स्वर्ग निर्माण होईल! मग मला वर जाण्याची काय गरज?' सांगण्याचे तात्पर्य असे की, स्वर्ग आणि नरक या काल्पनिक गोष्टी असल्यातरी वास्तविक जीवनात कर्माद्वारे, वर्तनाद्वारे, स्थितीतून माणूस त्याचा अनुभव घेऊ शकतो. म्हणजेच याच धरतीवर माणसाने माणसांशी प्रेमाने, सहकार्याने, सलोख्याने, आत्मियतेने वागला तर वास्तविक स्वर्गाची प्राप्ती करु शकतो. शहनशाह बाबा अवतारसिंहजी महाराज आपल्या अवतारवाणीत लिहितात,

मानवात मानवता नसता समजा तो मानव नाही।
तो नर जाणा पशू निशाचर कर्तव्या जागृत नाही।
मानव जन्मामध्ये येऊनी कर्म करी दानवा परी।
नसून ते अज्ञान तयाचे सैतानाचे काम करी।

(पद क्र. ३५२)

माणूस पशूसमान दानवी कृत्य करुन नैतिक मुल्यांचे अधःपतन करत आहे. माणूस चंद्रावर गेला, पण पृथ्वीवर माणूस हा माणूस म्हणून राहिला नाही. माणूस मातीशीच बेईमान झाला. थोर महामातीवर व माणसावर प्रेम केले म्हणून त्यांनी मानवता धर्म निर्माण केला. आज त्यांच्या विचारांचा विसर पडल्याने माणुसकी हरवून बसलो आहोत. वैज्ञानिक प्रगतिच्या युगात जग जवळ आले, पण माणूस माणसात राहिला नाही. एका उर्दू शायराने म्हटले आहे.

सबकुछ किया इस तरक्की के जमाने में;
लेकिन क्या गजब है, आदमी इन्सान नही होता।

माणसाला मानसिक शांती मिळविण्यास मदत व्हावी म्हणून धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सवांची सुरुवात केली गेली होती. परंतु त्यांचा वांछित परिणाम निळत नसल्याचे दिसून येत नाही. आणि त्यासाठी दोषी आहे माणसाचा पैशाचा अतिलोभ, भौतिक मायेचे अतिआकर्षण. पैसा व भोगविलासावरच सारे लक्ष केंद्रित केल्याने आपल्याला जीवनाचा खरा अर्थ काय? याचा मुळी विसर पडला आहे. जीवनात जीवन देणाऱ्या प्रेमाचा साफ विसर पडला आहे. संकुचित वृत्तीने मतलबी जीवन जगत आहे. जसे म्हटले आहे.

माणूस हा सामाजिक प्राणी, एकमेकांशिवाय होत नाही
मतलब साध्य झाल्यावर, तुझं माझं जमत नाही

सामाजिक मुल्यांचा ऱ्हास थांबविण्यासाठी परिवर्तन अत्यंत आवश्यक आहे, तथापि हे परिवर्तन आंतरिक असले पाहिजे. जर प्रत्येक मानवात परिवर्तन झाले तर समाजात दृष्ट प्रवृत्तीची वाढ होणार नाही. धकाधकीच्या जीवनामुळे माणूस विमनस्क होऊन गेलेला आहे. अशावेळी आत्मविश्वास अंगिकारुन प्रत्येक कार्य विचारधिष्ठीत आणि प्रामाणिकपणे करणे गरजेचे आहे. मुलांवर उच्च जीवनमुल्यांचे संस्कार बालपणीच करण्याचे प्रयत्न केले पाहिजे. स्पर्धेच्या नावावर मुलांमध्ये द्वेष व घृणा वाढू देऊ नये. आपण त्यांना परस्परांवर प्रेम करण्याचे शिकवले पाहिजे. त्यांना प्रेम व कारुण्याचे धडे शिकविणे गरजेचे आहे. त्यातून इतरांचे दुःख कष्ट व शोषण दूर करण्यास मदत होईल, युध्द व हिंसक संघर्ष कमी होतील व विश्वशांतीचे स्वप्नही काही प्रमाणात साध्य होईल. इतरांचे दुःख समजून घेता आले पाहिजे. त्यासाठी एकच वस्तू हवी ते म्हणजे प्रेम! प्रेम जीवनाचा केंद्र बिंदू आहे. जर आपण आपली सर्व कर्म या बिंदूवर लक्ष केंद्रित करुनच पार पाडली तर स्वतः प्रेमाचा अनुभव करु शकू आणि हे प्रेम जीवनात नसल्याने आज सहृदय माणसे कमी होऊन हृदयशून्य यंत्रमानव जन्माला येत आहे.

जीवाला जीव लावणं जोपर्यंत होत नाही तोपर्यंत समाजात मानवता निर्माण होणार नाही. घराचं घरपण हरवून टाकण्याचं काम टिव्हीवरील मालिका करत आहेत. त्यापासून दूर राहून वैचारिक संपन्नता आली पाहिजे. म्हणून संत महात्मा माणसाला त्याच्या स्वरुपाची जाणीव करुन देत आहेत. अध्यात्माचे धडे शिकवून मानवता प्रदान करत आहेत. ते सांगतात, अध्यात्म पैसे कमविण्याचा व इच्छापूर्तीच्या विरुध्द नाही. परंतु माणसाने एक संकुचित दृष्टिकोन बाळगावा अशी रास्त अपेक्षा अध्यात्माकडून बाळगली जाते. संपत्ती (भौतिक माया) व मानवता तराजूच्या दोन पारड्यासारखे आहेत. त्यांच्यात संतुलन राहील याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

आज निरंकारी बाबाजी समस्त मानवाला एका परमतत्वाचा बोध करुन मानव परिवार एकत्रित आणण्याचा प्रयत्न करत आहेत. प्रत्येक जीवात स्थित असलेला आत्मा एक आहे व त्याचा नियंता, प्रतिपालक, परमात्मा देखील एक असून त्याच्यापासून सारी सृष्टी निर्माण झाली आहे. हा बोध केवळ समयाच्या सदगुरुमार्फत ब्रह्मानुभूतीद्वारे संभव आहे. म्हणून शहनशाह बाबा अवतारसिंहजी महाराज सांगतात-

येऊन करा प्रभुचे दर्शन हेच सांगणे जगताला।
मानवता शिकवी सदगुरु मज ऐशा हैवानाला।

(पद क्र.३४६)

घटाघटात, प्रत्येक मानवात एका प्रभूचे दर्शन झाल्याने परस्परांमध्ये आपोआप प्रेमभावना जागृत होईल. मानवता प्रस्थापित होईल. तेव्हाच माणसाला 'माणूस' म्हणवू शकतो. कारण माणसाची ओळख ही धर्म, जात, परंपरा यावरुन होत नसते तर ती माणुसकीवरुन होत असते. म्हणून म्हणावसं वाटतं,

राहून राहून वाटतंय, माणसा आता तरी जाग रे।
मनुष्य जातीची लाज तू, थोडी तरी राख रे....।

श्री. नितीन लक्ष्मण घुरुप
मु.पो. हरकोल कोन्ड, मागगाव, रायगड

जीवांचे कल्याण करा

प्रभू चरणी जरा विश्वास धरा
या सोन्यावानी जन्माचे सार्थक करा।।धृ।।

प्रभूने सुंदर ऐशी रचना केली
सर्वांहूनी सुंदर ही काया दिली
जाग रे मानवा कर विचार जरा ।।१।।

लक्ष चौऱ्यांशी योनी तुवा भोगिल्या
नरजन्म मिळाला हा तेव्हा तुला
वेळ दवडू नको जाण देव खरा ।।२।।

गुरु चरणी येता दु:ख होई भंग
आनंदाने मन नाचे होईल दंग
सदगुरुचा असा चमत्कार खरा ।।३।।

'वंदना' गुरुचरणी ही प्रार्थना करी
नम्रता प्रेम राहो या मनमंदिरी
भोळ्या भक्तासाठी दे तुझा आसरा ।।४।।

सौ. वंदना लोखंडे
हिंगोली

कर्मकांड आचरुनी मानव.....

मानव जीवन एक कर्मभूमी आहे. मनुष्याला ईश्वराने कर्माचं स्वातंत्र्य दिलं आहे आणि त्याचबरोबर योग्य दिशेने पावलं पडण्यासाठी विवेक बुध्दीही बहाल केली आहे. जेणेकरुन मनुष्य आपल्या जन्माचं उद्दिष्ट जाणून घेईल. आपल्या 'स्व' स्वरुपाचा बोध घेईल. साधु संतांनी दाखवलेल्या मार्गावर चालून ईश्वराची प्राप्ती करुन घेईल. मात्र आज पहायला गेलं तर याच्या विपरित भक्तीच्या नावाखाली वेगवेगळी कर्मकांडे आचरुन स्वत:चेच नुकसान करुन घेत आहे. ज्याप्रमाणे शहनशहा बाबा अवतारसिंहजी महाराज पवित्र अवतारवाणीत समजावतात,

कर्मकांड आचरुनी मानव बंधनात बंदी होतो।
कोळीयापरी जाळे विणूनी जीव आपुला घालवितो।
भले बुरे हे कर्म मानवा बंधन लोह-सोन्याचे।
ज्ञानावाचून कर्म हे सारे तिमिरा वाहून नेण्याचे।
कर्म एकची उत्तम आहे बाकी मिथ्या असे कहाणी।
अवतार प्रभू ज्ञानवीण जैसे घुसळावे रवीने पाणी।

(पद क्र.२५०)

आज मनुष्य वेगवेगळ्या प्रकारची कर्मकांड करुन स्वत:ला स्वत:च बंदिवान करुन घेत आहे. ज्याप्रमाणे कोळी जाळं विणत असतो त्यावेळी त्याचं एकच उद्दिष्ट असतं की, एखादा किटक येईल आणि या जाळ्यात अडकेल आणि माझं खाद्य होईल. मात्र त्याच जाळ्यात स्वत:च कधी अडकतो हे त्याचं त्यालाच समजत नाही. आज मनुष्याचीही तीच अवस्था आहे. कुणाला जातीचा, कुणाला धर्माचा, कुणाला विद्वतेचा तर कुणाला सत्तेचा अभिमान आहे. दृष्टिगोचर नसलेल्या या भिंती प्रत्येकाने मनात उभारुन स्वत:ला बंदिवान बनवून ठेवलंय आणि या भिंती जोपर्यंत मनातून नाहिशा



होत नाहीत तोपर्यंत त्याचं बंधन काही तुटणार नाही.

ज्याप्रमाणे शहनशहा या पुस्तकामध्ये (पान क्र.१९) शहनशहाजींना शास्त्रीजींनी प्रश्न विचारला, 'संगतमध्ये नेहमी ऐकायला मिळतं की चांगली कर्म सोन्याच्या बेड्या आहेत आणि निषिध्द कर्म लोखंडाच्या बेड्या आहेत. हे ऐकून वाटतं की, चांगली कर्म वाईट कर्मापेक्षाही जास्त खतरनाक आहेत, कारण लोखंडी बेड्या सोडता येतात पण सोन्याच्या बेड्या सोडणं फार कठीण आहे.' त्यावेळी शहनशहाजींनी सुंदर रीतीने समजावलं की, चांगल्या कर्माचा जो अभिमान आहे तो मोठा बलवान असतो, तर निषिध्द कर्माचा अभिमानच नसतो. उलट मनात ग्लानी असते. उघडच आहे की, चांगली कर्म ही तर चांगलीच आहेत, चांगल्या कर्मापासून जो सूक्ष्म अहंकार मनात येतो तो आनच्या बंधनास कारणीभूत ठरतो. म्हणूनच शहनशहाजी समजावतात की, ज्ञानावाचून ही सर्व कर्मे अंधाराला वाहून नेण्यासारखी आहेत. एखाद्याला वाटेल की, एखाद्या खोलीत असलेला अंधकार मी भरभरुन बाहेर फेकेन जेणेकरुन प्रकाश होईल. मात्र ती त्याची अज्ञानता असेल. गरज आहे ती एक दिप प्रज्वलित

करण्याची. तद्वतच अज्ञानरुपी अंधकार दूर करण्यासाठी कर्मकांडाची आवश्यकता नसून गरज आहे ती ज्ञानरुपी प्रकाशाचा जीवनात सूर्योदय होण्याची.

ज्याप्रमाणे संत निरंकारी मिशन के ज्योतिस्तंभ (भाग -२, पान क्र.२७) मध्ये निरंकारी मिशनचे पहिले प्रधान लाभसिंहजींनी बाबा बूटासिंहजींच्या जीवनातील एक दृष्टांत दिला आहे. एक सोनार असतो. त्याचा मृत्यू होतो. त्यामुळे त्याच्या कुटुंबावर अशी परिस्थिती येते की, एकवेळेचं अन्न मिळणं मुश्किल होतं. एक दिवस त्या सोनाराची पत्नी आपल्या जवळ असलेलं लाल नावाचं रत्न आपल्या मुलाकडे देते. ती मुलाला समजावते की, अमुक एका ठिकाणी तुझ्या वडिलांचे मित्र राहतात. त्यांना हे रत्न विक व पैसे घेऊन ये. तो मुलगा त्यांच्याकडे ते रत्न घेऊन जातो. त्यावेळी त्याच्या घरच्या परिस्थितीची जाणीव त्या मित्राला होते. तो त्या मुलाला ते रत्न घरी नेऊन उद्यापासून आपल्या दुकानावर अलंकार बनवण्याचे काम शिकण्यासाठी येण्यास सांगतात. जेणेकरुन तुझ्या वडिलांचं दुकान तू पुन्हा चालू करु शकशील. काही काळानंतर ज्यावेळी असली व नकली सोने, हिरे, लाल याची पारख करण्यामध्ये तो तरबेज झाला. त्यावेळी तो वडिलांचा मित्र त्या मुलाला म्हणतो, 'मुला जो लाल रत्न तू विकण्यासाठी आणला होतास जो तुझ्या आईने कित्येक वर्षे सांभाळून ठेवला आहे. तो उद्या घेऊन ये. त्याचं मूल्य तुला मिळेल.' मुलगा प्रसन्न होतो. धावतच घरी जातो. आईकडे तो लाल रत्न मागतो. मात्र तो हातात घेताच फेकून देतो. आई ते दृश्य पाहून आश्चर्यचकित होते. एवढी वर्षे जपून ठेवलेलं लाल रत्न फेकून देण्याचं कारण ज्यावेळी आई विचारते त्यावेळी मुलगा आईला समजावतो, आई आपण किती वेडे होतो. नकली लालला असली समजून वर्षानुवर्षे सांभाळत राहिलो. आज ज्यावेळी मला पारख करण्याची दृष्टी प्राप्त झाली त्यावेळी ती समज आली की त्या लालची किंमत कवडीभर सुध्दा नाही. आपणच अज्ञानी होतो. त्यामुळे निरर्थक वस्तू सांभाळत राहिलो. सांगायचा भावार्थ हाच की, आपण सुध्दा असेच कर्मकांडामध्ये गुंतलो होतो. या कर्मकांडानाच वास्तविक लाल समजून बसलो होतो. साधुसंतांची वाणी श्रवण करत होतो. पठनही करत होतो. ज्याप्रमाणे ज्ञानेश्वर माऊलींनी स्पष्टपणे लिहून ठेवलंय,

योगायोग विधि येणे नोव्हे सिध्दि।
वायाचि उपाधि दंभधर्म।।१।।
भावेविण देव न कळे निःसंदेह।
गुरुविणा अनुभव कैसा कळे।।२।।

(हरिपाठ ५)

आजही हे सर्व वाचतो आहोत, पठण करित आहोत, पण वास्तविक जीवनात उतरवण्याचा प्रयत्न मात्र केला जात नाही. निरंकारी मिशनची सुध्दा अशी अनेक पुस्तकं आहेत की, जी भ्रमातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक पण- परंतुचं उत्तर मिळतं. दासी ज्यावेळी निरंकारी मिशनची 'शहनशहा, कुलवंत, भक्ती सोपान, देवाची ओळख, निरंकारी मिशनचे ज्योतिस्तंभ - भाग -१ व भाग-२, अवतार उपदेश' अशी अनेक पुस्तकं वाचू लागली त्यावेळी दासीचे किंतु-परंतु नाहिसे झालेत. अज्ञान दूर झालं. एवढंच नव्हे तर निरंकारी मिशनच्या होऊन गेलेल्या साधू-संतांच्या जीवनातून एका गुरु-भक्तांचं जीवन कसं असावं जेणेकरुन भक्तीचा आनंद स्वतःलाही घेता येईल व इतरांना देखील देता येईल याची प्रेरणा मिळाली. आणि म्हणून दासी सर्वांच्या चरणी हीच अरदास करेल की, निरंकारी मिशनचे साहित्य प्रत्येक संत- महात्म्यांनी वाचा आणि बंधनातून मुक्त होऊन आपला इहलोक-परलोक सुखी करा.

सौ. मयुरी महेश मुंज
राजापूर बाजारपेठ, रत्नागिरी

खरंच आम्ही माणूस बनलो का ?

बहु सुकृताची जोडी, म्हणूनी विठ्ठली आवडी. फार मोठं पुण्य पदरी पडलं त्यामुळे वर्तमान काळात विठ्ठलानं मानव योनीत जन्माला घालून हृदयात ईश्वर (विठ्ठल) भक्तीची प्रेम ज्योत लावली. सर्व जगातील लोक विठ्ठलाची भक्ती करतात पण भक्ती चालू आहे. विठ्ठलाला जाणल्याशिवाय गीतेमधील वचनाप्रमाणे -ईश्वर खालील पंक्तीत दिल्याप्रमाणे आहे.

नैनं छिन्दन्ती शस्त्रांणी, नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।

(भगवत गीता अध्याय २, श्लोक २३)

आत्म्याला शस्त्रांनी कापता येत नाही तसेच अग्नीने जाळता येत नाही, तसेच पाण्याने भिजवता येत नाही आणि वाऱ्याने सुकविता येत नाही. आज आम्ही भक्ती करत आहोत आपल्या स्वार्थापायी व भीतीपायी. आम्ही स्वतःच स्वतःची किती मोठी फसवणूक करत आहोत हे आम्ही जाणत नाही. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर एक हजार वर्षापूर्वीचे असेल पण संत म्हणतात, 'जेव्हा नव्हते हे चराचर तेव्हा होते पंढरपूर.' मग कोणतं पंढरपूर होतं ते ? आणि कोणता विठ्ठल किंवा पांडुरंग होता त्यावेळेस ? प्रभू प्रेमी ईश्वरनिष्ठ संताच्या म्हणण्याकडे कधी आमचं लक्ष गेलं का नाही ? संतांनी कोणत्या विठ्ठलाला पाहिले व आम्ही कोणत्या विठ्ठलाला पाहतो ? हे या गोष्टीकडे प्रामुख्याने आम्ही लक्ष द्यायला हवे.

हा निर्गुण आहे, याची लांबी,रुंदी, उंची मोजता येत नाही. हा विराटात विराट आहे. सूक्ष्मात अती सूक्ष्म आहे. याचा अंत नाही म्हणून याला अनंत किंवा बेअंत म्हणतात. याचा जन्म होत नाही व मृत्यू देखील होत नाही म्हणून हा अजन्मा आहे. याला कोणता ही लेप लावता येत नाही म्हणून हा निर्लेप आहे. तो कणा-कणात विराजमान आहे. त्याला कुठलाही आकार नाही म्हणून तो निराकार आहे. तो येत नाही जात नाही. कायम-दायम आहे. अशा या निराकार प्रभूला जाणून ओळखून जर आम्ही भक्ती करु व प्रभूच्या इच्छेप्रमाणे आम्ही आमचे जीवन बनविण्याचा प्रयत्न केले तर निश्चितच आमचे जीवन जगण्याचे सार्थक होते, सफल होते. संतांनी म्हटले आह,

नर जन्मी येवूनी साधी नारायण।
नाही तर पशूहूनी हीन।

तसेच संतानी माणसाला उद्देशून म्हटले आहे की, 'मनुर्भव' माणूस बन. पशूंना म्हटले नाही की, पशू बन. कारण ते पशू योनीत जन्माला येऊन पशू प्रमाणेच आपले कर्म करीत आहेत. पशू परोपकारी सुध्दा आहे. एखादी गाय दुसऱ्या कोणाच्या शेतात जाऊन चरली असता शेत मालकाने काठीने तिला मारले असता ती आपल्या मालकाकडे येऊन कुठलीच तक्रार करीत नाही किंवा त्या शेतकऱ्याला सुध्दा मारत नाही. वास्तविक शेतकऱ्याला जीवाने मारण्याइतकी शक्ती तिच्यात निश्चितच असते, पण मुकाट्याने घरी येऊन मालकाला गुंडी भर दुधच देते.

याच ठिकाणी एखाद्या माणसाला त्याच्या शेतातील गवत कापत असताना शेत मालकाने पाहिले असते व गवत कापणाऱ्या माणसाला त्याने मारझोड केली असती, तर त्या माणसाने वस्तीत येऊन आठ दहा माणसांना नेऊन त्या शेत मालकाला ठारही मारले असते व त्या शेतातील पिकांची नासाडी देखील केली असती. इतका फरक पशू आणि माणसात आहे. म्हणून संतानी म्हटले आहे, 'मनुर्भवः' माणूस बन.

पशू आणि मानव यांची तुलना केली तर बऱ्याच प्रमाणात हा सर्वात उत्तम योनी मधील मानवापेक्षा हे पशू सरसच भरतील. या सृष्टीकडे जर आम्ही पाहिले तर रचयीताचे गुण रचनेमध्ये दिसून येतात. मधुर आंब्याची कोय (बी) या जमिनीत लावली असता त्यापासून आम्हाला मधुर रसरशीत आंबाच त्या वृक्षापासून मिळेल.

तो कधी कारल्यासारखा कडू निश्चितच होणार नाही. पोपटाच्या पिलांमध्ये पोपटाप्रमाणेच रंग रुप दिसून येतात.

मग आम्ही त्या परम पित्याची (ईश्वराची) लेकरे आहोत. मग आमच्यात दैवी गुण असायलाच पाहिजे व असतात ही. पण आम्ही पाहिजे त्या तऱ्हेने त्यांचा विकास करत नाही. असे का होते ? त्याचे कारण आहे की, आम्ही परमपित्याची भक्ती, आराधना, पूजा व साधना खऱ्या पूर्ण सदगुरुला शरण जाऊन समर्पित होत नाही. या निराकार प्रभूची व आमच्या जिवात्म्याची ओळख करुन घेत नाही.

देव (ईश्वर), अल्लाह, गॉड हे सर्व आहेत एकच. या सृष्टीची निर्मिती त्यानीच केलेली आहे. म्हणून जे असते ते दिसते. फरक इतकाच की, काही गोष्टी म्हणजे आकारात असलेल्या वस्तू (नश्वर वस्तू) चर्म चक्षूनी दिसून येतात व शाश्वत दिव्य दृष्टीने दिसून येते. तोच पूर्ण सदगुरु जीवा शिवाची भेट घालून देऊ शकतो. तोच या आत्म्याचा व परमात्म्याचा बोध करुन त्याचे दर्शन घडवून देऊ शकतो. म्हणूनच संतानी म्हटले आहे.

सदगुरु है सब जग का दाता,
जो चाहे कर सकता है।
पत्थर भी जो चरणो को छू ले
भवसागर तर सकता है।।

तसेच

तीन लोक नऊ खंड में गुरु से बडा न कोय।
करता करे न कर सके, गुरु करे सो होय।।

म्हणून जीवनामध्ये सदगुरुची प्राप्ती होणे फार महत्वाचे. सदगुरुकडून ब्रह्मज्ञान म्हणजे आत्मा परमात्म्याचे ज्ञान मिळवून सदगुरुच्या वचनाप्रमाणे आपले जीवन पाच प्रणाप्रमाणे व तीन कर्मा (सेवा, सत्संग व स्मरण) प्रमाणे बनविले तरच माणूस 'माणूस' बनू शकतो. सदगुरुच फक्त निराकार प्रभुची साकार सत्ता आहे, तोच आम्हाला दिव्य दृष्टी देऊन, आम्ही या पृथ्वीवर कशासाठी आलो म्हणजे जन्म घेण्याचे मुख्य ध्येय कोणते ? आम्हाला या पृथ्वीवर कोणते काम करावयाचे आहे ? व आपले कर्म पूर्ण झाल्यावर आम्हाला कोठे जावयाचे आहे ? या सर्व गोष्टीची माहिती आम्हाला सदगुरुच देणारा आहे.

ईश्वराला पाहिले, समजले व ओळखले सुध्दा, पण निराकार प्रभुला रिझवून आपले केले नाही तर आम्हीच आमच्या सारखे दुर्देवी होऊ. याकरीताच समयाचे सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या शिकवणी प्रमाणे आम्ही आमचे जीवन बनवायला पाहिजे. ते म्हणतात, ''एकाला जाणा, एकाला माना व एक व्हा।'' म्हणजे अनेकाला नव्हे एकाला जाणून त्याला आपलं बनवून घ्यावं. ''ब्रह्माची प्राप्ती भ्रमाची समाप्ती'' म्हणजेच ब्रह्मज्ञान घेऊन ब्रह्माची प्राप्ती केल्यानंतर चराचरात बघून आमच्या अंग संग आहे. या गोष्टीचे भान ठेवून भ्रमाची समाप्ती करुन घ्यावी. आमच्यात जो ईश्वरी अंश आहे किंवा आमच्यात जी ईश्वरी सत्ता काम करत आहे याच्या कृपा प्रसादानेच, आम्हाला या पृथ्वीवर स्वर्ग निर्मिती करावयाची आहे. सर्वांना माणुसकीची वागणूक देऊन विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करावयाची आहे.

आपल्यात जेव्हा विनम्रता, सहनशीलता, मनाची विशालता, या चराचराविषयी प्रेम, सदवर्तन, दयालुता या भावनांचा विकास करावयाचा आहे. पदोपदी हा निराकार, साकार सत्ता सदगुरुला साक्षी ठेवून आम्हाला सर्व कर्म करावयाची आहेत व पदोपदी स्वनिरिक्षण करावयाचे आहे की, मानवतेला लाजविणारे कर्म आम्हाकडून होत तर नाही ? या पृथ्वीवर स्वर्ग स्थापन करण्यासाठीच संत आम्हाला हाक मारत आहेत. आम्ही सदैव एक दुसऱ्याला आदर, सत्कार, प्रेमभावना व बंधु प्रेमाच्याच नजरेने पाहिले तर. याकरीता आम्हाला आमचे स्वतःचे फार बारकाईने आत्मनिरिक्षण करणे आवश्यक आहे, की खरोखरच आम्ही माणूस बनलो का ?

श्री. सत्यनारायण बाजीराव सौभागे
ता. मेहकर, जि.बुलढाणा

वाचकांना निवेदन

निरंकारी पत्र-पत्रिकांच्या दरात वाढ केली जात आहे जी ०१.०९.२०१२ पासून लागू होईल. संत निरंकारी आणि हसती दुनिया मासिकाच्या एका अंकाची किंमत १० रुपये तसेच एक नजर पाक्षिकाची किंमत ५ रुपये असेल.

परिवर्तित नवीन दर पुढीलप्रमाणे असतील. भारत व नेपाळ साठी एका वर्षाकरीता १०० रुपये, ३ वर्षांसाठी २५० रुपये, १० वर्षांसाठी ६०० रुपये, आजीवन (वीस वर्षांसाठी) १००० रुपये द्यावे लागतील.

जर आपण ३१.०८.२०१२ पर्यंत सभासदत्व प्राप्त करत असाल, तर जुन्या दराप्रमाणे वर्गणी द्यावी लागेल. जे सभासद आजीवन सभासदत्वाची रक्कम हप्त्यामध्ये जमा करत असतील त्यांनी कृपा करुन ३१.०८.२०१२ पर्यंत शिल्लक रक्कम जमा करावी अन्यथा त्यांना नवीन दराप्रमाणे रक्कम भरावी लागेल. ज्या सभासदांच्या आजीवन सभासदत्वाला २० वर्षे पूर्ण झाली असतील ते सुध्दा ३१.०८.२०१२ पर्यंत जुन्या दरानुसार नुतनीकरण करु शकतात. त्यानंतर वाढलेल्या रकमेनुसार आपली रक्कम भरावी लागेल.

- सी. एल. गुलाटी
प्रभारी पत्रिका विभाग
संत निरंकारी मंडळ, दिल्ली ११०००१

सावधान

सुखप्रीत सिंह (उर्फ राजू) सुरजित सिंह, गाव-मुस्तालीपुर, पो. ठाकरद्वारा, जिल्हा-मुरादाबाद (यु.पी.), वय २६-२७ वर्षे, उंची ५ फूट ५ इंच. सदर व्यक्ती महापुरुषांना आपल्या गोड स्वभाव आणि अवतारवाणीच्या गायनाने प्रभावित करुन महापुरुषांबरोबर अनेक प्रकारची फसवणूक करत आहे. देश आणि परदेशातील प्रभावशाली व्यक्तिंबरोबर आपला संबंध असल्याचं सांगून संतजनांना आपल्या जाळ्यात फसवत आहेत. ट्रॅव्हेल एजन्सीच्या माध्यमातून व्हीसा देण्यासाठी लाखो रुपयांची अफरातफर केली आहे.

देशातील ब्रँचचे प्रमुख, मुखी महात्म्यांना निवेदन केले जात आहे की, सदर व्यक्तीच्या जाळ्यात अडकण्यापासून संतजनांना सावध करावे. अशा अनेक व्यक्ती असू शकतात जे अशाप्रकारची फसवणूक करत असतात. त्यांच्या प्रलोभनात कदापिही फसू नये.

ब्रिगेडीअर पी.एस.चीमा (सेवानिवृत्त)
सुरक्षा आणि समाजकल्याण विभाग
संत निरंकारी मंडळ, दिल्ली - ११० ००१

देवाची ओळख - मनुष्याचे आद्यकर्तव्य

मानव मी मानवा सारिखा इतरा जैसा देह मला।
ज्ञानांजन घालून गुरुने ज्ञानदृष्टी दिधली मजला।।

(अ.वा.पद क्र.५)

आज संत महात्मा हाच आवाज देत आहेत की, माझ्यासारख्या मानव दुसरा देखील आहे आणि त्याच्यामध्ये देखील तोच परमेश्वर विराजमान आहे. जसे तुकाराम महाराज सांगतात की,

पंधरा दिवसा माजी झाला साक्षात्कार।
विठू भेटला मज निर्गुण निराकार।।

मग प्रभू परमेश्वर मला जर या मनुष्य देहात भेटला आहे, मग कशाला मी कोणत्या पंढरपूरात, कोणत्या मंदिरात, कोणत्या तीर्थक्षेत्रात जाऊ? मला आज गुरुने ज्ञानांजन घालून ती ज्ञानदृष्टी दिली. मग जिथे पाहू तिथे केवळ परमेश्वरच मला दिसत आहे. मग कोणाशी वैर करु, कोणाशी घृणा करु?

पण खरे पाहता या युगात प्रत्येक माणूस दुसऱ्याशी वैराने वागत आहे, एकमेकाचे वाईट चिंतीत आहे. जसे महात्मा एका उदाहरणाद्वारे स्पष्ट करतात की, एखादा डास (मच्छर) दुसऱ्या डासाला चावत नाही, त्याचे रक्त तो पीत नाही, कारण त्याला माहीत आहे की, तो डास माझ्याच जातीतील आहे, माझ्यासारखाच तो आहे. परंतु मनुष्याला वेळोवेळी सांगावे लागते की, 'माणसा तू माणूस बन'. कारण माणूस 'माणूस' असून देखील तो जनावरांसारखी कर्मे करत आहे. जसे एका शायरने म्हटले आहे,

ना प्यार कर सका वो कभी इमान से।
ना प्यार कर सका वो कभी अपने धरम से।
पैदा होकर इन्सान की कोख मे।
ना प्यार कर सका वो कभी इन्सान से।

म्हणून वेळोवेळी संत महात्मा हाच आवाज देत आहेत. जसे एका गीतात सांगितले आहे,

चालला व्यर्थ वाया श्वास,
मानवा हे कैसे भुललास।
दिले वचन देवाला तू, तुझे करिन ध्यान।
बाहेर येताचि झाला तू बेईमान।
कवा, कवा टाहो फोडलास,
मानवा हे कैसे भुललास।।

आज या दुनियेत आल्यानंतर खऱ्या परमेश्वराची ओळख विसरुन मोह, माया यामध्ये गुंतून खऱ्या मनुष्याच्या गुणांची ओळख करायची हेच विसरुन गेला आहे.

नरजन्मी तरी साधी नारायण। नाहीतर हीन पशूहून।

देवी देवतांना दुर्लभ असलेला मनुष्य जन्म आपल्याला प्राप्त झाला, ज्याला हा अनमोल नरदेह प्राप्त झाला आहे त्याने परमेश्वराला ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर परमेश्वराला ओळखण्याचा प्रयत्न केला नाही तर पुन्हा त्याला पशुपेक्षाही हीन कुळात

दुसरा देह धारण करावा लागतो. म्हणून लक्ष चौऱ्याऐंशी योनी फिरल्यानंतर हाच एक मनुष्य जन्म आपल्याला मिळतो ज्यामध्ये सर्व कर्मांचे फळ आपल्याला मनुष्य जन्मात मिळते. मग जर या परमेश्वराची प्राप्ती याच जन्मात, याच वेळी केली नाही तर अवतारसिंहजी आपल्या अवतारवाणीत सांगतात की,

गेला समय न येई हाती, अनुताप होईल अंती।
निरोप येता यमदूताचा, नयन तुझे भरोनी येती।

हाच तो समय आहे ज्यामध्ये या परमेश्वराची प्राप्ती करायची आहे. परंतु मनुष्य मोह, माया, धन, संपत्ती, नाती-गोती यामध्ये फसला आहे. **'मानव काया तरुनी जाया मिळाली रे तुजला, नको विसरु कर्तव्याला।'** आणि यामध्ये फसून परमेश्वराची प्राप्ती करायची हे कर्तव्य तो विसरला आहे. म्हणून प्रत्येक वेळी संत महात्मा हाच आवाज देत आहेत की,

माणसा आता तरी हो जागा
नाहीतर पुढे आहे दगा।

परमेश्वराची ओळख करुन मनुष्याचे खरे ध्येय जाणून या गफलतीच्या झोपेनधून जागा हो. स्वतःची जाण कर आणि हेच माणसामधला 'माणूस' जागा करण्याचं काम समयाचे सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज करत आहेत. जसे बाबाजी सांगतात, **'मानवाचं होईल भलं, जर एकोप्याने राहता आलं।'** तसेच **'हर युग सुंदर, हर सदियाँ सुंदर, हर पल सुंदर अगर मानव जीवन हो सुंदर।'**

तर माणसामधला खरा माणूस शोधून ''मानवता है धर्म हमारा, हम केवल इन्सान है।'' हे जाणून प्रेमाने आणि एकरुपतेने राहून आपला इहलोक आणि परलोक सुखी करुया.

कु. अनिकेत सुभाष पांचाळ
काशिमिरा, मुंबई

~~~~~~~~~~

तुझी भक्ती घडो देवराया

(चाल - मेरी प्यारी बहनियाँ)

नको निंदेची छाया नको ती मोहमाया
तव चरणी झिजावी ही काया
बाबा हरदेवा सदगुरुराया ।।धृ।।

पाच प्रण सांगूनिया दिलं ब्रह्मज्ञान
अंगसंग दाखविला देव भगवान
भोळ्या भक्तांवर असे तुझी थोर कृपाछाया
तू आलास दुःख हराया ।।१।।

गाता तुझी किती वेद पुराणेही थकले
शरण तुला येता लक्ष चौऱ्याऐंशी चुकले
जन्मोजन्मीचा हा शीण टाकियेला मिटवून
सुख मिळालिया गुरुपाया ।।२।।

दास 'बंडू' विनवितो सकळ जनाला
सफल करा तुम्ही नर जन्माला
हेचि मागणं मागतो दोन्ही हातानी जोडितो
तुझी भक्ती घडो देवराया ।।३।।

श्री. बंडू जोशी
डोंबिवली, जि. ठाणे
~~~~~~~~~~

सत्संग एक कवडसा

माझ्या घराशेजारी सत्संग भवन आहे. दर रविवारी ७ ते ९ दरम्यान सत्संग चालायची. कुणी विचारातून, तर कुणी गीतातून सेवा घेत होते. मुख्य व्यासपीठावरुन अर्धा तास प्रचारक महात्मे विचार सांगत होते. देव माझा हा चोहीकडे, मात्रृदेवो भवः, पित्रृदेवो भवः, प्रेम की भाषा सर्वोत्तम भाषा, नर पूजा नारायण पूजा अशा आशयातून सर्वजण कर्ता करविता परमेश्वर समजून आपलं उरलेलं आयुष्य सदगुरु स्मरणात जावं असाच आपल्या मनाचा भाव प्रगट करीत होता.

किल्लारी हे २० हजारापर्यंत लोकवस्तीचं गाव, ग्रामीण रुग्णालय, ह्यात अप्पा म्हणून प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदावर कार्यरत. सत्संगात त्यांची भूमिका अग्रेसर. एका रविवारी मी सत्संगला हजेरी लावली. विचार ऐकले, ते पटले. पण माझ्या मनानं गडबड केली. जगावं कुणासाठी ? पती दुर्धर रोगाला बळी पडले. एकुलती एक मुलगी तिही कावीळीनं ग्रस्त. डॉक्टरांनी सांगितलं होतं की, काही इलाज नाही. माझं सर्वस्व संपलं होतं. आशेचा किरण अंधारात सामावत होता. माझं आयुष्य कितपर्यंत आहे याचा मी अंदाज वर्तविला होता. एकच निश्चय, कुठतरी जावं व आयुष्य संपवावं.

सत्संग संपली तसा अप्पानां प्रश्न विचारला, तुम्ही रक्त, लघवी तपासता का ? होय. किती पैसे लागतात. काहीच नाही. माझ्या मुलीला कावीळ झाली आहे. तपासणी आवश्यक आहे. दुसऱ्याच दिवशी अप्पांनी तपासणी केली. अहवाल व त्याचबरोबर औषध आणून माझ्या डोळ्यादेखत मुलीला घेण्यास सांगितले आणि पथ्य समजावले. अहवाल बिकट होता. मी जास्त काळजीत पडेन म्हणून अप्पानी सर्व काही गुपित ठेवलं होतं, पण नित्यनियमाने. औषध खाल्ले किंवा नाही हे पाहण्यासाठी माझ्या दारी येण्यास अप्पाना यत्किंचितही कमीपणा वाटला नाही.

औषध लागू होत होते. बस मुलीच्या चेहऱ्यावर हासू उमलत होतं. कोमेजलेली कळी उमलत होती. तसा सदगुरुचा आशीर्वाद पाठीमागे असतो असंच काही महापुरुष सांगत. माझी काळजी संपली होती. तसा निरंकारीचा भाव माझ्या मनात जागृत झाला किती परोपकार, दया, क्षमा एकमेकाप्रती आदर. माझ्या मनानं निग्रह केला आपणही निरंकारी बनावं आणि पुढील आयुष्य सदगुरुचरणी समर्पित करावं.

डिसेंबर ९९ चा तो दिवस. महात्मा महादेवजी बिराजदार (लातूर) यांचेकडून मी निरंकार ईश्वराचे ज्ञान घेतले त्या दिवसापासून एकही रविवार न चुकवता सत्संग करित राहिले. मला परमेश्वराकडून एक वसा मिळाला होता आवाजाचा. त्यामुळे माझी दर सत्संगला हजेरी लागत असे. आम्ही सर्वजण बाहेरगावी सुध्दा सत्संगला जात असू. मला प्रेम आवडले होते. ती प्रेमाची भाषा. आपुलकी, सर्वांच्या हृदयात अंश या नात्याने परमेश्वरीय तत्व, माणसा तू माणूस बनची परिभाषा. असेच प्रत्येकाचे विचार महापुरुष आणि भगिनी स्वतः आचरत व दुसऱ्याला सांगत.

दिल्ली समागम व मुंबई समागम मी कधी सोडला नाही. कधी पैशाची चणचण भासली नाही. मला सौ. शांता पाटील (किल्लारी) यांनी आपलं मानलं होतं. आज आपली म्हणणारी स्वार्थापूरती राहिली आहेत, पण त्या नात्यानं परक्या असूनही आपलं मानत होत्या. ही तर विचारधारा आहे ब्रह्मज्ञानीची, एकाच छत्राखाली सदगुरुच्या वावरण्याची.

दिनांक ६ एप्रिल २०१० सायंकाळचे ५ वाजले असतील. निरंकारी बाबाजींचा सोलापूर दौरा. आम्ही ठरवलं उमरगा या ठिकाणी सदगुरुचं दर्शन घ्यावं. असंच झालं. मला त्याठिकाणी गीताची सेवा मिळाली. गीत संपल्यानंतर दर्शन घेतलं. बाबाजींनी आशीर्वाद

(पान ३८ वर)

ब्रह्मविद ब्रह्मैव भवति!

अर्थात ब्रह्माला जाणणारा अंती ब्रह्म होतो. वेदामध्ये म्हटल्याप्रमाणे मनुष्य जेव्हा या परम सत्याला अर्थात प्रभू परमात्म्याला जाणतो, पाहतो तेव्हा तो स्वतः परमात्मा बनतो हे युगानुयुगे साधु-संतांनी, अवतारी महापुरुषांनी आपल्या वाणीद्वारे, अभंग, ग्रंथ व अनुभवाद्वारे या समाजापुढे ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. परंतु आजच्या मानवाला मात्र या सत्याचा पूरता विसर पडला आहे. केवळ ईश्वराचे गुणगान, ग्रंथाचे वाचन, पठण व कर्मकांडाला महत्त्व देऊन आपले ईप्सित साध्य करण्याचा केविलवाणा प्रयत्न आज मनुष्य करत आहे.

वास्तविक साधु संतानी, अवतारी पुरुषांनी मनुष्यप्राण्याचा याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे की, जोपर्यंत मानवाला या निराकार सत्य ईश्वराचे दर्शन होत नाही तोपर्यंत त्याची यथार्थ भक्ती होऊच शकत नाही. किंबहुना तो मोक्षाचा धनी होऊ शकत नाही. जसे समर्थ दासबोध ग्रंथात म्हणतात,

न जाणता कोटीवरी। साधने केली परोपरी।
तरी मोक्षास अधिकारी। होणार नाही।
म्हणोनि जाणणे हाची। उपाय।
जाणता सापडे सोय। परलोकीची।

एवढ्या स्पष्ट शब्दात सांगूनही मनुष्य परमात्म्याला न जाणता भक्तीमार्गात सर्व गोष्टींचा-साधनांचा अवलंब करत आहे आणि म्हणून माणसाची भक्तीमार्गात मोठी फसगत होत आहे. या ईश्वराचे सत्य स्वरुप काय आहे याचा शोध घेणे म्हणजे खऱ्या अर्थाने भक्तीचा प्रारंभ आहे. कारण ज्याची भक्ती करावयाची आहे, ज्याला आपल्या जीवनाचा केंद्रबिंदू मानणार आहोत, त्याची जर ओळख नसेल तर त्याच्याविषयी प्रेम निर्माण होऊच शकत नाही आणि जर प्रेम नसेल तर तेथे भक्ती कशी होईल. यासाठी भक्ती पूर्णत्वाला जाण्यासाठी मनुष्याच्या जीवनात समर्थ सदगुरु येणे गरजेचे आहे. पूर्ण गुरुच या पूर्णाची ओळख, दर्शन मानवमात्राला करुन देऊ शकतो. सदगुरुकडे ती दैवी शक्ती असते की, त्याद्वारे तो परमात्म्याचे सत्यस्वरुप आपल्या भक्तापुढे प्रकट करत असतो. जसे समर्थ म्हणतात,

सदगुरुचेनि अभयकरें। प्रकट होईजें ईश्वरें।
संसार दुःखे अपार। नासोनि जाती।।

अर्थात सदगुरुच्या करकमळात एवढे सामर्थ्य आहे की, एका क्षणात या सत्य प्रभूचे ज्ञान-दर्शन किंबहूना या देवाचे सत्यस्वरुप प्रकट करण्याची शक्ती श्रीगुरुंकडे असते. परंतु मनुष्यामध्ये या ईश्वराच्या दर्शनाची ओढ, ज्ञानप्राप्तीची जिज्ञासा सर्वप्रथम निर्माण होणे गरजेचे आहे आणि यासाठी ईश्वर म्हणजे काय? अध्यात्म म्हणजे काय? सदगुरुचे कार्य काय? या गोष्टींचा मानव विचार करत नाही तोपर्यंत भक्ती मार्गातील भ्रम मिटू शकत नाहीत. जेव्हा अर्जुनाने भगवान श्रीकृष्णांना प्रश्न केला, हे पुरुषोत्तम अध्यात्म कशाला म्हणतात? तेव्हा सर्वेक्षर भगवान श्रीकृष्ण म्हणाले-

ऐशिया आपुलियाची सहज स्थिती।
जया ब्रह्माची नित्यता असती।
तया नाम सुभद्रापती। अध्यात्म गा।।११।।

(ज्ञानेश्वरी अध्याय ८)

अर्जुना जे या विश्वात गच्च भरलेले आहे, कोंदले आहे, ज्याचा तिन्ही काळात नाश होत नाही. जे परब्रह्म आकाराबरोबर जन्मत नाही, आकाराच्या ऱ्हासा बरोबर त्याचा ऱ्हास होत नाही. संपूर्ण विश्वात कायम एकाच अवस्थेत असणारं जे अखंड ब्रह्म आहे. त्यालाच अध्यात्म म्हणतात, ईश्वर म्हणतात असे परम सत्य तत्व संपूर्ण विश्व अंतर्बाह्य व्यापून राहणारे, स्वयंप्रकाशी, अरुप, अजन्मा आणि शुध्द ज्ञानतत्व म्हणजे ईश्वर होय.

ज्याचे अस्तित्व कणाकणात आहे. याविषयी समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

श्रवणें शब्द ऐकता। मनें विचार पाहता।
मना सबाह्य तत्वता। परब्रह्म ते।
चरणे चालता मार्गी। जे आडळे सर्वांगी।
करे घेता वस्तूलागी। आडवे ब्रह्म।

किंवा

पक्षी अंतराळी गेला। भोवताली आकाशाचि तयाला।
तैसे परब्रह्म। प्राणीयांसी व्यापून आहे।।

समर्थ सदगुरु जीवनात आल्यानंतर या कणकणवासी, घटघटवासी निराकार ब्रह्मतत्वाची ओळख होऊन तो भक्त निरंतर या सत्य ईश्वराचे चिंतन करण्यात मग्न होतो. कारण तुम्ही कोठेही जा, कोणतेही कार्य करत रहा हे ईश्वराचे सत्यस्वरुप तुम्हाला सदोदित अंतर्बाह्य व्यापून आहे याची साक्ष तुम्हाला पटलेली असते. आणि मग खऱ्या अर्थाने सर्व कर्मकांड, साधने यांचा त्याग करुन मनुष्य सत्संग, संताचे दर्शन, सेवा यामध्ये स्वतःला समर्पित करतो.

अशा या परमसत्तेला जाणणं म्हणजे ईश्वर दर्शन होय. आणि या सत्य तत्वाचं दर्शन किंवा ज्ञान जो ज्ञाता करुन देतो तो समर्थ सदगुरु होय. आज समस्त मानवमात्राला या अद्वैत ज्ञानाचा उपदेश सदगुरु हरदेवसिंहजी महाराजांच्या कृपेने एका क्षणात होत आहे आणि एकदा का हे ईश्वरीय ज्ञान प्राप्त झाले की, या भक्तीमार्गातील सर्व भ्रम, संदेह मिटून जातात आणि तो भक्त अलौकिक अशा दैवी गुणांनी युक्त होऊन या ईश्वरीय राज्यात मग्न होऊन स्वानंद सुखाची अनुभूती प्राप्त करतो. मग जसं सुरुवातीलाच म्हटलं की, 'ब्रह्मविंद् ब्रह्मैव भवति!' खऱ्या अर्थाने तो भक्त ईश्वर बनून जातो. सदा सर्वदा नित्यप्रती या निराकार प्रभूशी योग साधून जीवन जगण्याची कला तो प्राप्त करतो.

श्री. जगदीश म्हात्रे
चिंचपाडा, पेण, रायगड

सत्संग एक .....(पान ३६ वरुन)

दिला. त्या दिवसापासून एकच ध्यास. सदगुरुचा संदेश जनमानसापर्यंत पोहचविण्याचा प्रण केला.

जानेवारी २०११ चा संत समागम. तो सोनेरी दिवस. मला गीताची सेवा मिळाली. ''सामोरी पाहता हा दृष्टी पडे, देव माझा हा चोहिकडे'' समोर दृष्टी टाकली. नजर स्थिर होत नव्हती. समोर त्रिमूर्ती बसल्या आहेत. मी सेवेसाठी उभी आहे. मला क्षणभर वाटलं स्वप्न तर नसावं. सेवा संपली, माझी खात्री पटली, स्वप्न नाही सत्य आहे. माझं केवढं भाग्य आणि याच भाग्यात मी पोरकी होणार होते. केवळ सदगुरुचा आशीर्वाद.

आज जवळ जवळ १३ वर्षे झाली असतील माझ्या जीवनात कसलीच कमतरता भासली नाही. कारण सर्वस्व सदगुरु मानल्यानंतर 'मी' चा भाव नष्ट होऊन 'तू' चा भाव निर्माण होतो. मला ती वेळ आठवतेय. आपण आयुष्यातून संपणारी पण वेळीच सत्संगच्या माध्यमातून सावध झाले. एवढे भाग्याचे क्षण माझ्या नशिबी होते, पण मला वेळ नव्हती. आयुष्यात सुखाचे क्षण येत असतातच याचा मला अनुभव आला. यातच दूधात साखर पडावी तसा योग. किल्लारी येथे नारी सत्संगची स्थापना झाली व त्याची सुत्रता माझ्यावर सोपविली. आज नित्यनियमानं नारी सत्संग व जनरल सत्संग करणं, आपल्याबरोबर एखादी नवीन महिला सत्संगला जोडणं, महापुरुष आणि भगिनीचं स्वागत करणं एवढीच सेवा करण्यात मी सदगुरुची धन्यता मानते, कारण प्रत्येक क्षणी सदगुरुचा दिव्य साक्षात्कार मला होत होता. या साक्षात्कारामुळेच मी व माझी मुलगी ज्ञान प्रकाशात जीवन जगत आहे. सत्संगामुळे मला एक जीवन जगण्याचा आधार मिळाला. याचं भान मी कदापिही विसरणार नाही. माझं गुरुमतावर चालण्याचं अंगी सामर्थ्य टिकून राहावं. नित्यप्रती सेवा, सत्संग व स्मरण घडावं एवढीच एक अरदास सदगुरुचरणी समर्पित.

शब्दांकन - **छाया दलाल** (किल्लारी)
प्रेषक - **सौ. मंगल मजगे** (किल्लारी)

वाचकांचे हितगुज

आदरणीय संपादक महात्माजी,
धन निरंकारजी

या वर्षीची संत समागमची संत निरंकारी मासिक पत्रिका आणि एक नजर पत्रिका पाहून संपूर्ण समागमचा पुन्हा एकदा आनंद प्राप्त केला. पत्रिकांची मांडणी, भाषाशैली, फोटो कलेक्शन सर्व बाबतीत समर्पित केलेली सेवा प्रकाशन विभागाच्या प्रत्येक महात्म्याचा भाव दर्शवित होता. दासला सर्वात प्रभावित केलं ते प्रत्येक संत महात्म्याच्या वक्तव्यावर (गीत किंवा विचारावर) प्रकाशन विभागाचे जे मत व्यक्त केले ते अप्रतिम वाटलं आणि तेही अतिशय रोखठोक. **उदा.** एखाद्याने वेळ जास्त घेतला असेल तर त्याचाही उल्लेख केला आहे. प्रकाशन-पत्रिका विभागाच्या या सेवेत तुम्हा सर्व महात्म्यांची श्रध्दा, भाव, सुसुत्रता, एकी, उत्साह पाहून आनंदाची प्रेरणा मिळाली. सदगुरु बाबाजी तुम्हा सर्व महात्म्यांना उदंड आयुष्य, विपुल धन, मोकळं आणि विशाल मन, समृध्द आणि निरोगी तन प्रदान करो जेणेकरुन हे सुंदर, अप्रतिम कार्य नित्य निरंतर घडत राहो.

श्री. सचिन झेंडे
कांजूरमार्ग, मुंबई

****

४५ व्या महाराष्ट्र संत समागमाचे जसेच्या तसे वर्णन मार्च २०१२ च्या 'संत निरंकारी' मराठी मासिक पत्रिकेत वाचावयास मिळाले व मन एकदम आनंदाने भारावून गेले. दासची सेवा संत समागमाच्या मैदानात एस.टी. महामंडळाच्या काऊंटरला असल्याकारणामुळे समागम मैदानात असतानाही संत समागमाचा आनंद पाहिजे तसा घेऊ शकत नव्हता. आणि समागमाचे ४ दिवस संपूनही दासला समागममध्ये गैरहजर असल्यासारखे वाटत होते. परंतु जेव्हा मार्च महिन्याचे संत निरंकारी मासिक हातात पडले आणि वाचावयास सुरुवात केली तेव्हा असे वाटले की ह्या क्षणाला मी संत समागमाचा आनंद घेतोय. कारण पत्रिका विभागाचे आ. कैलास कुटेजी यांनी अक्षरशः संत समागमाचे एवढे हुबेहुब वर्णन केलेले होते की एकेक शब्द-न-शब्द वाचताना त्यांच्या लेखणीची कला-कुशलता जाणवत होती.

आ. संजय जालगांवकर यांनी केलेली संपूर्ण मासिकाची सचित्र सजावट मासिकाची सुंदरता अधिकच वाढवत होती.

पत्रिका विभागाचे प्रभारी आ. चंद्रकांत जाधवजी व सर्व सहकाऱ्यांचे भरभरुन कौतुक करत सदगुरुचरणी हीच प्रार्थना करत आहे की, वेळोवेळी सदगुरु बाबाजींचा व संत महात्म्यांचा अनमोल खजिना आमच्यापर्यंत पोचविण्याकरीता आपल्या लेखणीमध्ये उत्तरोत्तर उन्नती होवो हीच शुभकामना.

श्री. राजेंद्र मेढेकर
कामोठे, नवी मुंबई

* * * * * * * *

महाराष्ट्राचा ४५वा निरंकारी संत समागम याविषयी संपूर्ण व परिपूर्ण माहिती व दर्शन घडवणारे मार्च या महिन्याचे मासिक खूपच छान आहे. दास याही वर्षी मुंबईला आला होता, परंतु काही कारणात्सव माझ्या परिवाराला यावयास मिळाले नाही. आपल्या या मासिकामुळे मला मुंबईचा सत्संग पुन्हा ताजा करावयास मिळाला, जणू सत्संगामध्ये बसलो आहे असे वाचताना जाणवत होते. माझ्या परिवारालाही सत्संग चुकवला याचे दुःख वाटले नाही. कारण सदगुरु बाबाजी यांचे विचार त्यांना वाचावयास मिळाले. बाबाजींचे हे वाक्य माझ्या परिवाराला व मला पूर्णपणे पटले आहे की, "मनुष्य संसाराला मनामध्ये धारण करतो." महापुरुष म्हणतात, "संसारात रहा, पण निराकाराला मनामध्ये धारण करा." म्हणून अशा

आपल्या चांगल्या चांगल्या युक्त्या बऱ्याच फायदा करतात. त्यामुळे संपादक महात्मा व त्यांच्या संघाला खूप खूप धन्यवाद

श्री. शंकर शामराव कुंभार

मु.पो. समडोली, ता.मिरज, जि. सांगली

****

४५ व्या महाराष्ट्र संत समागमनिमित्त माहे मार्च २०१२ चा 'संत निरंकारी' मराठी मासिक पत्रिकेचा अंक अतिशय आकर्षक आणि प्रत्येक क्षणांचा वृत्तांत लेखणीबध्द करुन प्रेरणादायी ठरणारा असल्यामुळे वाचून खूप आनंद झाला.

ज्या ज्या संत-महापुरुषांना आपल्या दैनंदिन जीवनात पोटाची खळगी भरण्यापासून उसंत न मिळाल्यामुळे या समागमला जाऊ शकले नाहीत त्यांना जणू या समागमात उपस्थित आहोत असा आनंद हा अंक वाचताना झालेला आहे. अशा अवर्णनीय वृत्तांताने आमचे सर्वांचे हृदय हेलावून टाकलेले आहे. या संत समागमच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंतच्या प्रत्येक कृतीची माहिती देणाऱ्या ज्ञानाच्या अंकाचा अनमोल खजिना पूर्ण महाराष्ट्रात पोचविल्याबद्दल आपले आणि आपल्या सर्व सहकाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

आपण आणि आपल्या सर्व सहकारी टिमचे कौतुक करुन सद्गुरुचरणी हीच प्रार्थना आहे की, सद्गुरु बाबाजींची विचारधारा आमच्यापर्यंत पोचविण्याकरीता आपल्या लेखणीमध्ये उत्तरोत्तर उन्नती होवो अशा शुभकामनेसह हे पत्र पूर्ण करीत आहोत.

श्री. मधुकर सोनवणे

अंबड रोड, जालना

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

४५ व्या महाराष्ट्र संत समागमनिमित्त जानेवारी २०१२ च्या 'मानवाला मानव प्रिय असावा, एकमेकांचा आधार बनावा' या त्रिमूर्तीच्या दर्शनाने खूपच सुंदर आहे. किसन नगर-ठाणे (सेक्टर -१६) येथील महापुरुषांनी तर कमालच केली आहे. संत निरंकारी मिशनच्या पुरातन ऐतिहासिक क्षणांना जागृती प्रदान केली आहे. मिशनच्या पायाभरणीचे आधारस्तंभ नावाजलेले आपल्या कर्तृत्वाने तप-त्याग सेवापूर्ण जीवन जगलेल्या गुरुशिख महापुरुषांच्या वय, उंची, चेहरेपरी हुबेहुब साजेशी वेशभुषा महापुरुषांच्या जिवंत प्रतिमा साकारल्या आहेत. प्रधान लाभसिंहजी, डॉ. देशराजजी, रामसरणजी, बाबू महादेवसिंहजी, संतोखसिंहजी, जुगलकिशोरजी व भगत रामचंद्रजी हे निरंकारी मिशनचे सात स्तंभ जणू हुबेहुब मानवी प्रतिकृती साकारल्या आहेत. मिशनची शोभा सर्वांच्या कुतुहलाचा विषय झाला आहे. गुरसिख महापुरुषांच्या मनाला शीतलता प्रदान करत आहे. संत समागमचे सर्व चित्रच डोळ्यासमोर उभे राहिले. सद्गुरु बाबाजींच्या दिव्य अमृतवाणीमुळे सर्व मानवास खरी दिशा लाभत आहे. सद्गुरु कृपेने आपण केलेल्या लेखन संपादनामुळे वाचकांना ज्ञानाचा लाभ घडत आहे.

श्री. चंद्रकांत सूर्यभान साळे

किल्ला पारडी, वलसाड, गुजरात

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

माहे फेब्रुवारी २०१२ ची मासिक पत्रिका वाचली. संपादकीय ज्ञानातून निराकाराचे सखोल ज्ञान मिळाले. मातृवचनामृतातून सेवा व त्यातील भाव कसा असावा हे समजलं. अनमोल खजिन्यातून सद्गुरुकडून आपल्याला काय देण मिळालेली आहे, तिचा जीवनात उपयोग केला तर जीवनसुध्दा अनमोल बनतं. "मर्यादा" या शीर्षकावर आपण स्वत: मर्यादा पाळून मर्यादीत लेखन, संपादकाच्या मर्यादेत राहून 'मर्यादा पालन एक सुखी जीवन' हेच तंत्र लेखकांनी वाचकास दाखवून दिले. आपली भक्ती गुरुमर्यादेनुसार असावी असं काही कवींनी आपल्या कवितेतून दाखविले आहे. सर्व कथा वाचक प्रिय वाटल्या. नेहमी असाच प्रसाद मिळत राहावा, हिच सद्गुरुचरणी प्रार्थना.

प्रेषक - सौ. मंगल मजगे

शिव नगर, किल्लारी, लातुर

****



सद्गुरु बाबाजींच्या पावन छत्रछायेत शीतलाखेत (उत्तराखंड) येथे आयोजित सत्संग समारोहाचे भावपूर्ण दृश्य

संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन द्वारा संत निरंकारी पब्लिक स्कूल, दिल्ली-९ येथे आयोजित संगणक प्रशिक्षण शिबिरात सहभागी युवा सदस्य व प्रबंधकगण

हलद्वानी (उत्तराखंड) येथे आयोजित सत्संग समारोहात सद्गुरु बाबाजींचे आशीर्वाद प्राप्त करताना श्रध्दाळू भक्तगण

Printed Matter
RNI No.59874/93
Postal Regd No.MH/MR/EAST/91/2012-2014
Publishing date 27th of every previous month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 27th of every previous month

सोमेश्वर (उत्तराखंड) येथे सद्‌गुरु बाबाजींचे आशीर्वाद प्राप्त करताना स्थानिक श्रध्दाळू भक्त

मसूरी (उत्तराखंड) येथे आयोजित सत्संग समारोहात आशीर्वाद प्रदान करीत असताना सद्‌गुरु बाबाजी, सोबत मातृशक्ती

मुरादाबाद (उ.प्र.) येथे आयोजित सत्संग समारोहात सद्‌गुरु बाबाजींचे प्रवचन श्रवण करीत असलेला विशाल जनसमूह